डॉ. नितीन मोरे

# व्यक्ती आणि कथा ४

कर्ण.. जाड्या.. चक्रधर..इ..



# व्यक्ती आणि कथा ४

## कर्ण.. जाड्या.. चक्रधर इ.

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# व्यक्ती आणि कथा ४

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- ५ सप्टेंबर २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे त्रेपन्नावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# व्यक्ती आणि कथा ४

## कर्ण.. जाड्या.. चक्रधर इ.

डॉ. नितीन मोरे

# व्यक्ती आणि कथा ४

## अनुक्रम




१. चक्रधर

२. सरीसृप

३. जाड्या!

४. अ-माणूस

५. कर्ण

६. धनेश

७. एकलव्य

८. सुकडोजी महाराज!

९. सोमण आजोबा

१०. जाल वकील

११. सुदाम

१२. बाबा टेलिफोनानंद

# चक्रधर

आज खूप दिवसांनी अचानक भेटला चक्रधर. रस्त्याने चाललो होतो, पाठून हाक आली,

"साहेब.."

हा आवाज लगेच ओळखला मी. चकित होऊन मी मागे पाहिले.

"कसा काय चक्रधर? तू? इकडे?"

"होय साहेब. आलो होतो इकडे. बरं झालं भेटलात. मी येणारच होतो घरी.."

"कसा आहेस? दिसतोयस तसा खुशीत!"

"होय साहेब. कारणच तसं आहे!"

चक्रधर रस्त्यातच हकिकत सांगणार की काय? म्हटलं,"चल गाडीत बस! येतोयस घरी?"

गाडीपर्यंत आलो तसा चक्रधर म्हणाला,"द्या साहेब, चालवतो मी गाडी."

मी चावी त्याला दिली. सवयीचा रस्ता असल्यासारखा चक्रधर गाडी चालवत होता. त्याची कहाणी सांगत.

चक्रधर चव्हाण म्हणजे माझ्या गाडीचा पहिला ड्रायव्हर. मी तसा वैद्यकीय व्यवसायात बिझी होतो. शहरीभागात दवाखाना चालवणे नि गाडी चालवणे दोन्ही गोष्टी तशा स्ट्रेसफुल म्हणाव्यात अशा. शेवटी नाइलाजाने गाडीसाठी मी पहिल्यांदाच वाहनचालक नेमला, तो चक्रधर. तेव्हा तो तरूण होता. पंचविशीत असावा. सडाफटिंग. रहायचा जवळच. यायचा वेळेवर नि कामाला चोख. महत्वाचे म्हणजे निर्व्यसनी होता अगदी. बोलायला नम्र नि उगाच वेगात गाडी चालवण्याची तरूण रक्तात असणारी खोडी त्याच्या अंगी नव्हती. अगदी सुरक्षित वाहन चालवायचा तो. गाडी चालवता चालवता त्याच्या साध्या स्वभावाने तो घरचाच झाला जणू. मध्ये मध्ये दवाखान्यात येऊन बसायचा. लहानग्या पेशंट्स बरोबर खेळायचा. म्हाताऱ्याकोताऱ्यांना हात द्यायचा. कामाबद्दल तक्रार नाही, कामाचा कंटाळा नाही. अशातच त्याचे लग्न ठरले. ठरले म्हणजे त्याने स्वत:च ठरवले. त्याच्या घराजवळच राहणारी कुणी होती. मी कित्येकदा त्याला त्याच्या मोबाईलवर हसत हसत खूप वेळ बोलताना पाहिलेले. ते तिच्याशीच असणार. अर्थात यातली एकही गोष्ट कधी तो मला बोलला नव्हता. पण स्वत:च्याच लग्नासाठी सुट्टी हवी हे ही न सांगता त्याने एक दिवस ऑफ घेतला. दुसऱ्या दिवशी थेट पेढे देत लग्न झाल्याचे सांगितलेले मला.

"साहेब, प्रतिमा नाव तिचं. दुसऱ्या जातीतली आहे म्हणे. माझ्यासाठी माणूस हीच जात. पण लोकांना कोण सांगणार?"

"पण तिच्या घरी?"

"परवानगी नाही. मग देवळात जाऊन हार घातले. उगाचचा खर्च वाचला! काय आहे साहेब, मी शिकलेलो नाही फारसा. नववी पास. दहावीला इंग्रजीचा धसका घेऊन शाळा सोडली. प्रतिमा चांगली दहावी झाली. हुशार आहे पण घरच्यांनी नाही शिकू दिलं पुढे. लहानपणापासून एकत्र आहोत आम्ही.."

चक्रधर इतका कधी बोलत नसे. पण त्यादिवशी बोलत होता.

"मला नोकरी मिळायची वाट पाहात होतो. तुम्ही चांगले भेटलात. म्हणजे उगाच कामावरून काढणार नाहीत मला. तुमचं काम दिसतं मला. त्यात माझी मदत थोडी.. पुण्याचे काम तेवढेच."

माझ्या कामात मदत हे खरंच होतं. शहरातला वैद्यकीय व्यवसाय म्हणजे सदा धावपळ. सदैव भरलेला दवाखाना, जेवायलाच वेळ मिळे कसाबसा. त्यात बाहेर कुठे आल्या तर इमर्जन्सी, होम व्हिजिट्स.. एक ना दोन. त्यात मग गाडी चालवणे नि त्याहून जास्त मुश्किल पार्किंगची जागा शोधणे.. या साऱ्यांमुळेच तर चक्रधराला माझ्या गाडीचे चक्र सोपवले होते मी.

चक्रधर नाव नि तो ड्रायव्हर व्हावा! पण मुलाचे पाय पाळण्यात दिसले की त्याचे नामकरण त्यानुसार होत असावे असे काही दिसत नाही. कारण बाराव्या दिवशी गोळ्यासारखं दिसणारं नवजात बाळ ते, नवजात आईच्या सासूला आपल्या मुलासारखं नि नवजात बापाच्या सासूला आपल्या मुलीसारखं दिसत असतं! त्यात त्याचे वा तिचे पाळण्यातले पाय कोण पाहतंय! पण चक्रधराचे नाव चक्रधर ठेवले जावे नि तो पुढे जाऊन वाहन चालक बनून चक्र हाती धरावा.. हा

काव्यगत न्याय आपोआप जुळून यावा ही एक गोष्ट मात्र खरी होती. अर्थात कुणी करियर करायची म्हणून वाहन चालक बनत नाही. बहुतेक जण इतर काही न जमल्यास कौशल्याधारित नोकरी म्हणून वाहन चालक बनत असावेत. तसाच हा. कमी शिकलेला. थोडेफार इंग्रजी समजणारा. म्हणजे मोबाईल चालवण्याइतपत तरी. कधी मला मेसेज पाठवायचा इंग्रजी लिपितल्या मराठीत. इंग्रजी नि गणित या विषयांनी कित्येक मुलं गळपटतात. मागे पडत जातात. त्यात त्या विषयांचं काठिण्य किती, मुलांची मंद बुद्धी म्हणा किंवा शिकण्याबद्दलचा निरूत्साह म्हणा, तो किती नि आईवडलांचे न मिळू शकलेले मार्गदर्शन वा शिकवण्यात कमी पडणारे शिक्षक यांच्यामुळे किती .. कोणास ठाऊक. कित्येक विद्यार्थी यामुळे इतर बाबीत चांगले असले तरी शिक्षणात मागे पडत जातात. चक्रधराचे शिक्षणचक्र ही या इंग्रजी विषयात रूतून बसलेले हे खरे! दिवसेंदिवस चक्रधराच्या असण्याची सवय झाली मला. म्हणजे बहुतेक बाबींसाठी त्याच्यावर अवलंबून राहता येऊ लागले. माझ्याकडे तो जवळजवळ दहा वर्ष नियमित कामावर होता नि एक दिवस म्हणाला,"साहेब, पुढच्या महिन्यात गावी जातोय.."

"किती दिवस?"

"दिवस नाही साहेब, नेहमीसाठी.."

त्याला शहरी जीवनमान परवडत नव्हतं. तोवर त्याला दोन मुली झालेल्या. भाड्याच्या घरात राहात होता तो, आता भाडी वाढत होती, स्वत:चे घर या शहरात घेण्याइतपत ऐपत नव्हतीच त्याची.

"अरे, पण काम काय करशील?" मी न राहवून विचारले. माझ्या वाहनचालकावरच्या अवलंबित्वापेक्षा त्याची काळजीच मला खरी वाटत होती.

"साहेब, तुमच्याकडचं काम सोडवून जाववत नाही. पण पैशाचं सोंग नाही आणता येत. गावी छोटं घर आहे. आजूबाजूच्या कारखान्यात कुठे तरी मिळून जाईल नोकरी.."

पुढे चक्रधर गावी गेला. तो मध्ये कधी भेटायचा इकडे आला तर. गावी त्याला तसे काम मिळालेले. जवळच्या शाळेत मुलींचं शिक्षण सुरू होते. नवल म्हणजे दोन मुलीं पाठोपाठ तिसरा मुलगाच व्हावा या प्रयत्नात त्याने मुलींची क्रिकेटची टीम उभी करण्याचा नाद घेतला नव्हता. एकदा असाच भेटला तेव्हा म्हणाला ही,"मुलगा नि मुलगी यात भेद करणं पटत नाही मला. तसे पाहिले तर प्रतिमा माझ्याहून जास्त हुशार आहे. मी गावी गेलो नि तिने बीए पूर्ण केलं. बीएड केलं. एका ड्रायव्हरची बायको, शाळेत शिक्षिका म्हणून लागली. पोरींना शिकवते तीच.. घरच्या खर्चात तिचाही हातभार मोठा. उगाच मुलगा मुलगा म्हणून डोक्यावर घेऊन नाचण्यात काय अर्थ आहे? मुलींना, दोघींना शिकवणार आम्ही."

पण गेली काही वर्ष तो भेटला नव्हता. कदाचित आला नसावा इकडे. आज भेटला तर गाडं खुशीत दिसत होतं..

चक्रधर सोडून गेल्यावर माझ्याकडे दोन तीन ड्रायव्हर अजून कामाला येऊन गेले. नंतर वयानुसार मी कामच कमी केले नि स्वत:च गाडी चालवू

लागलो. आज चक्रधर परत माझ्या गाडीच्या स्टियरिंग व्हीलवर बसून आपली कहाणी सांगत होता..

"साहेब, आज अत्यंत खुशीत आहे मी. माझी छोटी आज बी.कॉम झाली. नुसतीच झाली नाही, तर पहिली आली. तिच्याच कामासाठी आलोय युनिव्हर्सिटीत.."

"वा! छानच!"

"मुलीच्या कॉलेजात बक्षिस घ्यायला गेलेलो. आईवडील म्हणून दोघे गेलो आम्ही. मुलीनं काय करावं? स्टेजवर बोलावलं आम्हाला. म्हणाली, माझे आई नि बाबा दिवसरात्र मेहनत करत होते आमच्यासाठी, बाबा ड्रायव्हरची नोकरी करत होते. पण आम्हाला शिक्षणात काही कमी पडू दिलं नाही.. डोळे भरून आले साहेब. आनंद अजून कशाला म्हणतात.."

"पोरीनं जाणीव ठेवली चक्रधर.."

"त्याचं समाधान आहे साहेब. आनंद नाही. नाही ठेवली जाणीव तरी पोरीनं नाव काढलं याचा आनंद झालाच असता.."

"पण संस्कार असतात बाबा.."

"कोणास ठाऊक साहेब. असतील किंवा नसतील.. साहेब, एकाच संस्कारातील दोन मुलं.. एक चोर, दुसरा पोलिस का होतो? माझी मोठी मुलगी साहेब.. लग्न होऊन गेली.. घरातून पळून. त्या आधी म्हणाली मला, बाबा मला गरिबी नकोय. शाळेत नि कॉलेजात कुणी विचारलं तर काय सांगावं मी? वडील काय करतात..? ड्रायव्हरी? बाकीच्या मुलांचे कुणी डॉक्टर कुणी ऑफिसर.. नि काय काय असतात. पोरीनं नाव टाकलंय. तसा नवरा चांगलाय तिचा. त्यामुळे सारं ठीक आहे. ती आनंदात आहे म्हणून आम्ही खुशच आहोत ना? तुम्हाला

सांगतो साहेब, दोघी लहान होत्या तेव्हाची गोष्ट. दोघींना टीव्ही बघायची भयंकर हौस. जायच्या शेजारीपाजारी. शेजारी काय.. या दिसल्या की कारणं शोधून दरवाजा बंद करून घ्यायच्या तोंडावर. पोरी कसानुसा चेहरा करत यायच्या परत. लागायचं कुठेतरी मनात. टीव्ही महत्वाचा नव्हता, पण चिमुकल्या जीवांचा मान नि अपमान महत्वाचा होता. तेव्हा प्रतिमाची नोकरी नव्हती. पोरींच्या वह्यापुस्तकांवर नि फी भरण्यात पैसा खर्च व्हायचा. टीव्हीची चैन कसली करणार? मग तिकडे साहेबाकडून ॲडव्हान्स घेऊन कसाबसा तो छोटा टीव्ही आला घरी. त्यावेळी मोठी मुलगी बोललेली, आई, बाबा मोठे असते तर टीव्हीपण मोठा आला असता ना? प्रतिमा चिडलेली, म्हणाली देखील, तुमच्यावरच खर्च करताहेत ना.. जवळून बघा, किती मोठे आहेत ते कळेल तुला.. कदाचित छोटीला कळले असेल. मोठीला पटले नसेल आणि काय? पण एकाच घरात दोन मुलींच्या दोन तऱ्हा! संस्कार म्हणावे की अजून काही?" बोलताना चक्रधराचा गळा भरून आला.

चक्रधराच्या बोलण्यात तथ्य होतेच. त्याला छोट्या मुलीचा सार्थ अभिमान होता.. पण त्याहून महत्वाचे, अशिक्षित चक्रधराला शिक्षणाच्या महत्वाची जाण दिसत होती.

"तुझं कौतुक करायला हवं चक्रधर. मुलींना जाणीवपूर्वक शिकवलंस. नाहीतर मुलींना शिक्षण देतं कोण?"

"शिक्षण सोडलं तर दुसरं देण्यासारखं आहेच काय साहेब माझ्याकडे? मी नववीत शाळा सोडली. असं नाही की मी शिकू शकलो नसतो. पण त्यावेळी शाळेचं महत्व कळलं नाही. कळलं तोवर वेळ निघून गेली. घरी कुणी मागे लागलं नाही. आई म्हणायची, अभ्यास कर.. पण ती स्वत: निरक्षर. माझ्या मागे कसली लागणार? नाही ऐकलं तिचं. न शिकणाऱ्या मुलांमागे पण वेगवेगळी

कारणं असतात साहेब.. एक पैसे नसणारे अति गरीब, त्यांना जगण्याचीच भ्रांत. दुसरे खरोखरच देवाने अक्कल कमी दिलेले. डोक्यात काही शिरू न शकणारे. नि तिसरे माझ्यासारखे.. इतकी ही कमी अक्कल नाही की शिकू शकत नाही.. पण आळस, कंटाळा किंवा निरूत्साह म्हणा, तेव्हा किंमत कळत नव्हती म्हणा. किंवा शिक्षकांनी तशी गोडी लावली नाही म्हणा. आमच्या शाळेत होते काही शिक्षकांनी आशा सोडलेले. नुसतेच खोडकर नव्हे तर वाईट संगतीला लागलेले. मी तसा नव्हतो. मी चांगुलपणा सोडला नाही कधी. पण नुसत्या चांगुलपणावर कामं होत नाहीत ना. ड्रायव्हर लायनीत व्यसनांसाठी कारणं शोधावी लागत नाहीत. पण मी कधी व्यसनांमागे लागलो नाही. बायको शिकायचं म्हणाली, शिकली ही. आता शाळेत मुलं घडवते. मी आपल्या दोन मुली घडवल्या, ती दरवर्षी अनेक मुलामुलींना घडवतेय. आनंद आहे.."

चक्रधर हाती गाडीचे चक्र धरून गाडी हाकत होता. आम्ही माझ्या घरी आलो. चक्रधराला पाहून ही पण खूश झाली..

शिक्षणाच्या अभावाने ठायी ठायी अडले असेल चक्रधराचे पण व्यवस्थित विचार नि कृतीचा संगम घडवत त्याने मुलींची आयुष्ये घडवली होती. चांगल्या आचार नि विचारांनी स्वत:च्या आयुष्याचे चाक कुठेच हातून न सुटण्याची काळजी घेत.. वाटलं, विचारांची शक्ती अगाध आहे. योग्य दिशेने केलेला विचार अशी आयुष्य घडवू शकतो नि अयोग्य मार्गावरून बिघडवू ही शकतो.

- शेवटी काय, या चक्रधरासारखे जीवनाचे चक्र सांभाळून हाताळता यायला हवे..

# सरीसृप

काल तशी गंमतच झाली. म्हणजे रस्त्यातून मी चाललो होतो. गर्दी नेहमीसारखी असायची ती होतीच. आजूबाजूस न बघता मी झपाट्याने झपझप पावले टाकत होतो. इतक्यात कुठून तरी हाक आली,

"ए गोंद्या!"

गोंद्या म्हणजे मी. माझे टोपणनाव. खूप कमी जणांना माहिती असणारे. म्हणजे बोलवणारा कुणीतरी लहानपणापासून मला ओळखणाराच असणार. मला आजूबाजूला कुठे कोणी दिसेना. इतक्या वर्षांनंतरही हा आवाज पक्याचा असल्याचे वाटत होते. पण आहे कुठे पक्या? खालून आवाज आला, "गोंद्या, मी इथे. खूप दिवसांनी भेटलास.."

आवाज खालून आल्यासारखा वाटत होता. वाकून पाहिले तर पक्या सरपटत होता. एकाएकी ताठ उभा राहिला. म्हणाला, "ओळखलंस?"

पक्याच होता तो. प्रकाश शशिकांत लुकतुके. हुशार आणि अभ्यासात लुकलुकणारा तारा. हा असा सरीसृप प्राण्यासारखा का सरपटतोय?

"कसा आहेस?" मी विचारले.

"कसा दिसतोय?"

"काहीतरी वेगळाच वाटतोयस?"

"वेगळाच? अर्थातच. किती वर्षे झाली!"

"म्हणून एवढा बदललास?

"अरे, पुलाखालून, नदीतूनच नाही तर समुद्रातूनही किती पाणी वाहून गेलेय. गोष्टी बदलतात. मी बदललो! काळानुरूप. पण फक्त काळानुरूप नाही. तर परिस्थितीनुरूपही. म्हणून तुला आश्चर्य वाटले असेल. पण.."

शाळेत असताना आमची चौघापाचांची गँग होती. त्यावेळी आईवडील शाळेत क्वचितच येत. 'फक्त हुशार मुलांशीच मैत्री कर' वगैरे प्रॅक्टिकल सल्ले देत नसत. त्यामुळे पक्याची आमच्याशी मैत्री हे आश्चर्य नव्हते. मी गँगमधला सर्वात मागास. म्हणजे अभ्यासात. पक्या पहिल्या दुसऱ्या नंबरात. कुशाग्र बुद्धीचा. पुढे मी आर्टसला गेलो. बीए वगैरे होऊन प्रायव्हेट मध्ये चिकटलो. आज पीएचडी होऊन मिळत नाहीत, पण त्या काळी बीए होऊनही नोकऱ्या मिळत असत. तसा चिकटलो. कारकुनी करण्यात आयुष्य गेले. तसा महत्वाकांक्षी मी फार नव्हतोच. त्यामुळे तसे त्याचे सुखदु:ख तर नव्हतेच. थोडक्यात मध्यमवर्गीय असायचे तितके सुखी जीवन. जास्तीची अपेक्षा नाही. कमी असल्याचे दु:ख नाही. पण पक्या हुशार. त्यामुळे पुढे गेला. तो सरकारी ऑफिसात लागला. पुढे ऑफिसर वगैरे झाला. शाळेनंतर कधीमधीच भेटलेला

तो. त्याची प्रगती ऐकवलेली. पण त्यालाही खूप वर्षे लोटली. मध्ये जग बदलले. म्हणजे क्षणोक्षणी बदलणारे जग आता दर अर्ध्या क्षणात, निमिषार्धात बदलायला लागले. बदल हा जगाचा स्थायीभाव असेल ही पण इतक्या वेगात जग बदलले की आजच्या जगाची ओळख उद्या पटू नये! त्यामुळे पक्या बदलला असणार हे खरेच. पण बदलत बदलत अगदी सरपटणारा प्राणी व्हावा? हे थोडे पटण्यासारखे नव्हते. पण झाले होते तसे हे खरे.

मला हाक मारणारा पक्या जमिनीवर लोळण घेत चालत होता काय.. मध्येच उठून सुळकन उभा राहिला काय.. तितक्यात तोच म्हणाला, "चल त्या ग्राउंडच्या कट्ट्यावर जाऊन बसू.."

त्या गर्दीतून तो झटझट पुढे झाला. कधी उड्या मारत, कधी चक्क कोलांट्या उड्या मारत तर कधी सरपटत पुढे झाला. मी माझ्या वेगाने थोडा पुढे जाईस्तोवर पक्या कट्ट्यावर पोहोचला देखील. माझ्यामागे पाठदुखी, सांधेदुखी वगैरे लागलेली. तसा मी लवचिकही नव्हतो कधी. खाली वाकणे ही हल्ली कठीण झालेले आणि हा माझाच समवयस्क पठ्ठ्या बिनधास्त वाकत नि टुणटुण उड्या मारत चाललेला. मला आश्चर्यच नव्हे तर कौतुकही वाटले. असतात काही जण लवचिक. पण तरीही म्हणून त्याने थेट जमिनीवर लोळण घ्यावी? अगदी सरपटत पुढे जावे? आता बसू तेव्हा खुलासा होईलच म्हणत मी कट्ट्यावर पोहोचलो तेव्हा पक्या शीर्षासनात होता. मला पाहताच परत स्वत:च्या पायावर उभा राहिला. त्याचे असे असणे हेच जणू नॉर्मल असावे असे समजत म्हणाला,"काय कसे काय चाललेय?"

"माझे काय असायचेय? नेहमी सारखेच. सर्वे संतु रूटीन: म्हणजे सर्वांसारखेच नि नेहमीसारखे नेहमीचेच रूटीन नेहमी सुरू असायचे.

कारकुनाच्या आयुष्यात खर्डेघाशी सोडून नवे ते काय असायचे? फक्त शाई निळी की काळी असणार इतकाच बदल. लाल शाईने खुणा करणारे ते आमचे सुपिरियर्स. आम्ही निळी शाई एके निळी शाई वाले. कसे चालणार? नेहमी सारखे! थोडक्यात मजेत!"

कदाचित पक्याला इतक्या मोठ्या उत्तराची अपेक्षा नसावी.  शाळेत मराठी विषय सोडला तर मला कशातच गती नव्हती. नि तसा मी सु-भाषिक. म्हणजे मराठीत मी भल्याभल्यांना मागे टाकीत असे. त्यामुळे भाषेचा वापर सोडला तर बाकी काही मला तेव्हाही जमत नसे नि आता ही. वर्गातही नको तेव्हा ती वापरल्याने शिक्षा भोगलेल्यात मी.

"बरंय तुझे.. नाहीतर मी!"

नाहीतर मी? म्हणजे? मला तर पक्या सुखी माणसाचे एक मूर्तिमंत उदाहरण वाटलेला. इंग्रजीत प्रोटोटाइप म्हणतात तशातला नमुना. त्यात सरकारी पदावर. अधिकारी. अगदी पेन्शनपण मिळेल अशी नोकरी. त्याच्या हुशारीचे चीज झाले असे वाटलेले. नि तो ही असे बोलत असावा?

"म्हणजे काय? तू तर बाबा मोठ्या हुद्द्यावर. ऑफिसर तू. आणि तू असे बोलावेस?"

"तुला नाही कळणार. खरेतर म्हणूनच मी असे म्हणतोय!"

मग तो आपल्या नोकरीची कहाणी सांगायला लागला. डिग्री मिळाली. पोस्ट ग्रॅज्युएट पण झाला तो. सरकारी नोकऱ्या तेव्हा उपलब्ध तर असायच्याच नि मिळायच्या देखील. तसा तो नोकरीत शिरला. प्रमोशन मिळत मिळत आज या पदावर पोहोचला. एवढ्या मोठ्या पदावरील कोणाला असे बोलावे लागावे?

"म्हणजे? मजेत नाही?"

"म्हटले तर आहे, म्हटले तर नाही."

"म्हणजे?"

"तुला नाही कळणार गड्या सरकारी नोकराच्या व्यथा.."

आता हा कथाकथन सुरू करेल? तसा मला वेळ भरपूर होता. नि नक्की ह्याची काय व्यथा असावी ही उत्सुकता ही होती. पक्याच्या कथा आणि व्यथा.. होऊन जाऊ देत!

"काय आहे ना, नोकरी म्हटले की सारे आलेच.."

"सारे म्हणजे? तुला नाही कळणार.."

"अरे मला नोकरीत तीस वर्ष झाली.."

"माझी नोकरी सरकारी. तुझी प्रायव्हेट.."

"पण नोकरी ती नोकरीच ना?"

"नाही रे गोंद्या. तू कुठे नि मी कुठे.."

ते खरेच! मी कुठे नि हा आमच्या शाळेतला टॉपर कुठे.

"तुला ठाऊक नसेल, किंवा कदाचित असेलही. मला सांग नोकरीत पुढे जायला काय लागते?"

"सिनियाॅरिटी?"

"अजून काही?"

"कॉम्पिटन्स?"

"अजून काही?"

"नशिब, वशिला वगैरे वगैरे.."

"तू अगदी थोडासाच बरोबर आहेस. हे सिनियाॅरिटी, हुशारी वगैरे ठीक आहे. म्हणजे असेल तर ठीकच. पण ती मूळ गरज नाही बरे.."

"म्हणजे?"

"नोकरीत हवा तो लवचिकपणा. जशी हवा तशी पाठ. जैसी चले बयार पीठ तैसी दीजे.. पाठीचा कणा लवचिक हवा. हवे तिथे हवे तसे हवे तितके वेळा हवे तिथून हवे त्या समोर वाकता यायला हवे. पाठीचा कणा कसा मुलायम हवा. वेताच्या छडी सारखा. हव्या तशा कोलांट्या मारा. आपल्या वरिष्ठांसमोर कसरती करा. मी नोकरीत लागलो. उघड्या डोळ्यांनी सारे पाहात होतो. मग म्हटले पाण्यात राहून माशासारखेच वागायला हवे. उगाच आपला ताठ कणा नि बगळ्यासारखी ताठ मान करून दाखवायचेय कोणाला? मग मी योगासने शिकलो. पाठीचा कणा वाकवायला शिकलो. आधी वाटे, हे काय सुरू आहे? पण त्याच योगासनांचा उपयोग मन:शांतीसाठीही व्हायला लागला. मग सवय झाली.."

"हुं.."

"मला ना मी कोळंबी असल्यासारखे वाटते सांगतो तुला.."

"कोळंबी?"

"हुं.. कोळंबी शिजवतात ना तेव्हा त्याच्या पाठीतून तो मज्जारज्जू का काय असतो तो काढून टाकतात.. मी माझा कणाच काढून ठेवून दिला. कोळंबीसारखा मी मग मस्त शिजलो. बरोबरच माझी करियरही शिजली म्हण! वाकता वाकता मी एक दिवस सरपटायला लागलो. साहेबांना म्हटले, तुमच्या पायी लोळण घेतो. पण माझी फाईल पुढे सरकवा. आता इतक्या वर्षांत

वाकण्याची नि सरपटण्याची इतकी सवय झालीय.. कधी मी चालतो कधी उड्या मारतो नि कधी सरपटतो, माझं मलाच कळत नाही.."

"म्हणजे सरिसृप प्राण्यासारखे?"

"खरेय. उगाच ते मान अभिमान स्वाभिमान वगैरे मी पणाच्या गोष्टी कटाप केल्या की सारे सोपे होते. आपण स्वत:ला मोठे समजतो. मग सारे बिघडत जाते. आपल्या समोरचा मोठा. मग त्याच्या समोर हवे ते करायलाच हवे. वाका, नाक घासा की लोळण घ्या. शेवटी पुढे जायचे तर हे करायलाच हवे. हे बघ काय ते.."

म्हणत त्याने आपल्या नाकावरचे आवरण काढले.

"हे कृत्रिम नाक. मुद्दाम बनवून घेतलेय. आपली काळजी आपल्यालाच घ्यावी लागते. नोकरीत घासून घासून लोकांची नाकं पार सपाट होऊन जातात. मी हे टणक आवरण बनवून घेतलंय. म्हणजे ओरिजिनल नाकाला प्रोटेक्शन!"

"वा! हे पहिल्यांदाच पाहतोय मी!"

"अरे, इच्छा तिथे मार्ग मिळतोच. पुढेच जायचे म्हटले की सारे आलेच. तिथे वृथा अभिमान कशाला? मी तर म्हणतो, साधुसंत सांगून गेलेत तसा मी पणा सोडलाय मी. मी मी म्हणणाऱ्यांना जमत नाही ते. त्यासाठी संन्यास काय घेतील.. वैराग्य काय आणतील. मी संसारात राहून सारे साध्य केले.."

तो मनातले बोलत होता. त्याचे लॉजिक बिनतोड होते. 'मी'पणा सोडण्याचा असा काही अर्थ होईल हे साधुसंतांना तेव्हा कुठे ठाउक असायला?

"म्हणजे तसा तू सुखीच आहेस की! मजेत अगदी. मग का म्हणालास तसा नाहीस ते?"

"त्याला कारण ही सवय. अरे अगदी अलिकडे पर्यंत सारे ठीक होते. पण आता सरकारी नोकरीतून रिटायर व्हायची वेळ आलीय. आमच्याकडे काही जणांना चार सहा महिन्यासाठी नोकरीचा काळ वाढवून मिळतो. तसा मी ही प्रयत्न करतोय. जमेल तितके सरपटून नि वाकून सहा महिने तरी वाढवून मिळतात का बघतोय. नोकरी आहे तर मी आहे. नाहीतर काय उपयोग सगळ्या कसरतींचा? बघू. कदाचित एक्स्टेंशन मिळेलही. कदाचित नाही. जमेल तसे जमेल तितके जमेल त्या पद्धतीने आपण प्रयत्न करत रहावे. मिळाले काही पदरात तर ठीकच. नाहीतर आहेच निवृत्तीबुवा. भजन करत बसावे लागेल.."

पक्या बोलत होता. त्याला त्याच्या न वाकण्याचे वाईट वाटत होते न सरपटण्याचे. फक्त आपल्या नोकरीतून निवृत्ती जवळ आल्याने तो तसा उदास होता. पुढे आमच्या इकडतिकडच्या गप्पा झाल्या. परत भेटण्याचा प्लॅन झाला. एकदा शाळेतल्या चारचौघांनी एकत्र येण्याचा बेत आखला गेला. मग तोच म्हणाला,"चल, निघायला हवे. उद्या सकाळी परत बॉसबरोबर मिटींग आहे. बघतो कुठे काही जमवाजमव, जुळवाजुळव करता येते का.."

मी ऐकत होतो. तो बोलता बोलता थांबला. मग उठला. दोन उड्या मारत सरपटू लागला. सरपटत सरपटत बघता बघता दूरवर निघूनही गेला.

- आणि मी दुखरे गुडघे घेऊन हळूहळू घराकडे निघालो.

# जाड्या!

त्याला सर्वच जाड्या म्हणायचे.

अगदी शाळेपासून. तसा तो जाडा होताच. जन्मापासूनच. अंगापिंडाने भरलेला. गोलमटोल चेहऱ्याचा. अगदी लहानपणचा गुबगुबीतपणा पुढे वाढता वाढता वाढे म्हणत शरीरमंडलाला भेदत गेलेला!

अर्थात त्याला 'जाड्या' म्हणणे कधी कुठे सुरू झाले याची कागदपत्री नोंद नाही. तसा इतिहासात उल्लेख होण्यासाठी तो प्रसिद्धी पावलेला माणूस आजवर तरी नाही. गंमत म्हणजे मोठ्या, महनीय किंवा महान व्यक्ती त्या तशा होणार हे माहिती नसते पण त्यांच्या आयुष्याची कहाणी लिहिताना त्यांच्या लहानपणच्या पाळण्यापासून त्यात दिसणाऱ्या वा न दिसणाऱ्या त्यांच्या पायांपर्यंत साऱ्या कहाण्या लिहिल्या जातात. ह्या नोंदी कोण कुठे ठेवत असेल?

ते एक असो.

पण आपल्या कथानायकाच्या 'जाड्या' ह्या नामकरणाची नोंद कुठेच नाही हे खरे. आजवर तो महान वा महनीय झालेला नाही. पुढे तसा होण्याची तशी शक्यता अजून तरी दिसत नाही. त्यामुळे ह्या अनोंदित इतिहासाबद्दल जास्त चर्वितचर्वण करण्याची गरज नाही.. तशी आवश्यकता नसेल, पण हे असे झालेले हे खरे! थोडक्यात शाळकरी वयातच त्याने 'जाड्या' ही उपाधी कमावली होती!

लहानपणची बाल चरबी पुढे वितळत विरघळून जाते. गुटगुटीतपणा पुढे कमी कमी होत जातो. काही बाल्यावस्थेतील गुबगुबीत भोपळे पुढे वाटाण्याच्या किंवा अगदी शेवग्याच्या शेंगेसारखे झालेलेही दिसतात. पण आपला कथानायक याला अपवाद! प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत कलाकलाने वाढणाऱ्या चंद्राप्रमाणे त्याचा गुबगुबीतपणा पुढे स्थूलपणातून गरगरीतपणाकडे झुकला.. मग तो थुलथुलीत झाला.. गुबगुबीतपणा, स्थूलपणा, गरगरीतपणा हे जाडेपणाचे तीन टप्पे ओलांडून!

पाळण्यात त्याचे पाय दिसले न दिसले पण त्याचे वजन पाळण्याला पेलवले नसल्याने त्याचा पाळणा लवकरच मोडला होता. अर्थात तो शेंडेफळ असल्याने त्याच्यानंतर घरात पाळणा हलणार नव्हता म्हणून फारसे बिघडले नाही इतकेच!

जाड्या शाळेत तसा ॲक्टिव्ह होता. वजनदार असूनही हालचालीत मंदपणा नव्हता. आपले सारे वजन सांभाळत तो धावत सुटे. अगदी खऱ्याखुऱ्या वाऱ्याशी स्पर्धा नसेल ही करत, पण एखाद्या खडखडणाऱ्या पंख्याच्या वाऱ्याशी तरी करेल इतपत वेगात धावायचा. खो खो नि कबड्डी त्याचे आवडीचे खेळ. कबड्डीत तो चपळाई पेक्षा आपल्या आडदांड वजनाने

कुणाच्या पकडीत येत नसे. खो खो त कोणाला खो देताना मात्र त्याच्या खो देण्याने समोरचा कुणी भेलकांडू नये याची काळजी त्याला घ्यावी लागे. वजनाने भारी असला तरी ही खेळांत ही तसा भारी होताच तो नि अभ्यासात ही तसा मागे राहणारा नव्हता.

स्थूल लोकांचेही इतरांप्रमाणेच दोन प्रकार असतात. एक चिडचिडे नि दुसरे सदा हसतमुख. जाड्या दुसऱ्या वर्गातील. कुणी 'जाड्या' 'जाड्या' म्हणून आधी चिडवले असेल. पण तो चिडतच नसेल तर चिडवून काय फायदा? शाळेत सरस्वती वंदनेच्या वेळी 'निशे:ष जाड्या पहा' म्हटले की सारे त्याच्याकडे पाहून हसत. काही दिवस त्याला 'नि:शेष जाड्या' ही म्हटले गेले. पण शेवटी 'जाड्या' हेच नाव चिकटले नि विशेषणाऐवजी विशेषनाम बनून राहिले. त्याचे मूळ नाव मागे पडले किंवा कागदोपत्री.. प्रगतीपुस्तकातच राहिले..

जाड्या शाळेतून कॉलेजात पोहोचला. अर्थातच स्थूलत्वाचा गुणधर्म घेऊन. पण तरीही तो तिकडेही तसा ॲक्टिव्ह राहिला. नाटकातून कामं करण्याची आवड त्याची. त्याच्या साइझमुळे हीरो बनू न शकणारा तो.. पण त्याबद्दल न खेद न खंत बाळगत साइड रोल नि कॉमेडी करत राहिला. कॉलेजच्या दिवसांतही त्याची गरगरीतपणाकडे वाटचाल सुरू राहिली. अभ्यासात तसा हुशार होता तो. त्यामुळे परीक्षा उत्तीर्ण व्हायचा सहज.

अशा ह्या जाड्याने कधीच वजन मनाला लाऊन घेतले नसेल का? आरशात आपली दिसणारी अवाढव्य आकृती पाहून त्याला काहीच वाटत

नसेल का? आजूबाजूला फिट नि काही कमावलेल्या शरीराचे कित्येक जण हीरो बनून फिरत असताना त्याला आपल्या साइझचे वैषम्य जाणवलेच नसेल का? आपल्या प्रचंड देहाचे धूड घेऊन फिरताना त्याला मनातल्या मनात त्याबद्दल काय वाटत असावे? न्यूनगंड वगैरे काही?

कॉलेजात तिघांचे त्रिकूट होते.. एकमेकांशी मेतकूट जमलेले. जाड्या, रड्या आणि चमच्या नामक तिघांवर कुठेतरी विनोदी काही लिहिले बोलले गेले आहे. तसे त्याला दोन मित्र होते. तिघांची तशी जोडी होती. बाकी दोघांनी त्याला 'जाड्या' म्हटले तरी ही तो आहे तसे स्वीकारलेले.. कथनाच्या सोईकरता त्याच्या मित्रांना रड्या आणि चमच्याच म्हणू.. जरी ते तसे नव्हते तरी ही.. जाड्या, रड्या आणि चमच्यात बाकी मित्रांत असतील अशीच बडबड व्हायची. तारूण्यसुलभ बाबींवर चर्चा व्हायची. कॉलेजातल्या सुंदरींवरून एकमेकांना चिडवणे व्हायचे, नि कधी कधी विषय जाड्याच्या जाडगेलेपणावर येऊन थांबायचा..

"तुझा प्रॉब्लेम ना जाड्या तुझं हे वजन आहे. कोण पोरगी पटकन तुला हो म्हणेल?"

"जाड्या, मनावर घे. वजन कमी कर!"

"खादाडासारखा खात सुटतोस म्हणून सुटलायस!"

"आम्हाला काय.. पण जे वाटलं ते सांगून सुटतो आम्ही!"

"पृथ्वीवरचा नाही तर जाड्या अरे तुझ्या गुडघ्यांवरचा भार तरी कमी कर रे!"

"तसा तू हीरो मटेरियल रे! पण कोण नाटककार तुला मेन रोल देणार?"

"पण बाकी रोल्स साठी तुझं पारडं लिटरली 'जड' आहे!"

"तुझं काय बाबा.. हेवी वेट तू!"

"जाडेपणा म्हणजे डायबिटीसला आमंत्रण! कमीतकमी त्यासाठी तरी वजन कमी करण्यामागे लाग बाबा!"

"बाकी जाड्या तू एक नंबरी आहेस.. तेवढं वजनाचं मनावर घे की!"

"एक ते वजन कमी कर.. मग बघ कॉलेज क्वीन मागे लागणार तुझ्या!"

अशा काही स्थूलमानाने स्थूलपणावर त्यांच्या कमेंट्स होत. जिंदा दिल जाड्या त्या हसून जिरवे नि त्यामुळे जणू अंगावर अजूनच मूठभर मांस चढे!

"अरे, जो है सो है! हीरो नहीं पर झीरो भी तो नहीं! आहे मी भारी वजनदार!" जाड्या म्हणे.

"भारी आणि वजनदार म्हण!" रड्या.

"किंवा भारीच वजनदार!" चमच्याची व्हॅल्यू ॲडिशन!

"अरे, असतं वजन जास्त एखाद्याचं. मी हवा खाऊन राहिलो तरी वजन वाढतं!" जाड्याचा डिफेन्स.

"तीच हवा शिरत असेल अंगात! टाचणी लावली की बाहेर पडेल.. फुस्स!" रड्याची त्यावर फुसकी!

"खरं सांगू, मला वजनाचं काही वाटत नाही! मी स्वीकारलंय स्वत:ला आहे तसं. बाकी प्रत्येकात काही न काही कमतरता असतेच. तसा मी थोडा फार वजनदार आहे इतकंच!"

"थोडा? थोडाफार? फार थोडा की फार?" चमच्याची यावर मल्लीनाथी.

थोडक्यात काय तर जाड्याला आपल्या जाडेपणाचा न्यूनगंड नव्हता नि वजन कमी करण्यासाठी काही करावे अशीही निकड त्याला मनापासून वाटत नसावी. जो है सो है म्हणत तो खुश होता.

कॉलेजचे रंगीबेरंगी दिवस संपवून खऱ्याखुऱ्या जगण्याच्या संघर्षाकरता तिघं तीन दिशांना पांगले. मधून मधून भेटण्याच्या प्रतिज्ञा झाल्या. वेगवेगळ्या गावांतले तिघे, तीन दिशांना विखुरले. जाता जाता देखील जाड्याच्या वजनदारपणावर चर्चा झालीच.. नि जाड्याने हसून तो विषय टाळलाच..

मध्ये काही वर्षे लोटली. तिघांच्या वाटा वेगळ्या आधीच झालेल्या. आपापल्या कामात मग्न अशा तिघांची तोंडं तीन दिशांना. मधून मधून भेटणं बोलणं होई.. पण ते तेवढंच. हळू हळू ते ही कमी होत गेलं. नुसती फोनाफोनी होत राहिली. मग एके दिवशी जाड्यानी ठरवलं.. भेटायचंच. ते ही आपल्याच कॉलेजच्या कट्ट्यावर. तोच वडापाव खायचा नि तोच कटिंग चहा मारायचा..

कट्ट्यावर रड्या नि चमच्या पोहोचले. जाड्याची वाट पाहात बसलेले दोघे.
"जाड्या आला नाही अजून?"
"येईल.. आता किती किलोचा झाला असेल?"
"हां.. बघूयात.. थुलथुलीत देहधारका.. कधी रे येशील तू?"
"एवढं वजन घेऊन यायचं तर वेळ होणारच!"
काही वेळ गेला..

बाजूलाच बसलेल्या एकावर नजर गेली नि दोघे एकदमच किंचाळले.. 'जाड्या.. तू? असा? असा कसा?'

आजवरच्या आठवणीतला थुलथुलीत देहाचा जाड्या आता एकदमच तरतरीत झाला होता. एखाद्या अभिनेत्याने ठरवून वजन कमी करावे तसा निम्म्यावर आलेला जाड्या.. त्याला पाहून वाटावं, याला जाड्या म्हणावं तरी कसं? रड्या आणि चमच्यांना देखील त्यांची ती नावं शोभत नव्हती नि आता जाड्याला देखील जाड्या म्हणणं योग्य नव्हतं!

"साल्या, ओळखलंच नाही तुला.. तू?" चमच्या म्हणाला.

"जाड्या, तुज जाड्या कसा म्हणू मी?" रड्याचं त्यावर रडगाणं!

"जाड्या, खरं सांग.. तूच आहेस ना? की डुप्लिकेट? साल्या बसलेलास जवळच नि ओळखही दाखवली नाहीस?"

जाड्याला बोलण्याची संधी न देता दोघं बोलत सुटले.

"अरे, तुम्ही ओळखता का याची वाट पाहात होतो! माझ्या मागे काय बोलता ते ऐकत!"

"च्यायला! बरं झालं जास्त शिव्या नाही घातल्या!"

"उलटं.. घातल्या असत्या तर बरं झालं असतं! याला कळलं तरी असतं खरं काय ते!"

जाड्या बदलला होता. गेली एकोणतीस वर्षं आपलं वजन मिरवणाऱ्या वजनदार भारीभरकम जाड्याला आता जाड्या म्हणणं शोभून दिसलं नसतं.

एखाद्या व्यायामशाळेतील नियमित कसरत करणाऱ्याप्रमाणे प्रमाणबद्ध शरीराचा तो.. जाड्या संबोधनाला विसंगत दिसत होता..

"अरे, इतकी वर्षे सांगत होतो.. पण ऐकलं नाहीस. आता कुठली जादूची किल्ली फिरली नि.." रड्या.

"जाडेराव बारीक राव झाले?" चमच्याने वाक्य पूर्ण केले.

"किल्ली? नव्हे गुरूकिल्ली! तीच तर बातमी द्यायला बोलवलंय!" जाड्या म्हणाला नि दोघांच्या उत्सुकतेचा रबर बँड ताणला गेला.

"आता मी सांगतो ते ऐका. विश्वास ठेवा वा ठेवू नका.. एक गोष्ट मात्र नक्की.. हा मी असा मी असामी म्हणून समोर आहे तुमच्या. एकशे पंधरा किलोवरून पंच्याहत्तरीत पोहोचलेला. गरगरीत वाटोळेपणाकडून चटपटीत तरतरीत चपटा झालेला."

"ते सगळं दिसतंय, पण हे कसं काय घडलं?" रड्याच्या प्रश्नावर चमच्या म्हणाला..

"लेट मी गेस!.."

काही क्षणात परत म्हणाला,"उसाच्या चरकात पिळून काढला असणार!"

"नाही! कोणीतरी कापसाची गादी काठीने धोपटतात तसा धोपटून काढला असणार!" रड्या!

"असं कशाला? कपडे पिळतात तसा पिळला असणार!" चमच्याचा अजून एक तर्क.

"छे! याला पिळून काढायला ते सुमो पैलवानच हवेत.. ते ही दोन. एका बाजूने डोकं पकडेल. दुसरा पाय! नि दोन्ही मिळून पिळून काढतील!"

"च्यायला! तुम्ही दोघंच पिळताहात मला! पैलवान कशाला हवेत?" जाड्या म्हणाला, "त्यापेक्षा खलबत्त्यात कुटला.. उखळीत कांडून काढला वगैरे सांगता आलं असतं!"

"अरेच्चा! खरंच की! तुला कसं नाही सुचलं?" चमच्या रड्याकडे पाहात म्हणाला..

"ते सोड! वुई आर इगर टू नो.. ऐसा बदल कैसा जाहला राजे?"

"की आपण आपके शत किलोचे वजन झाडते झालात?"

"सांगतो.."

जाड्या मुंबईत परतला तेव्हा असे काही होईल हे त्याच्या गावीही नव्हते. मुंबईत एका कंपनीत नोकरीस लागलेला तो. आणि त्याच्या पाठोपाठ आलेली त्याच्याच कॉलेजची ती! रूपा रूपवते. ऐकावं ते नवलच म्हणावं की स्वर्गात जोडलेल्या गाठी म्हणाव्यात.. नाटकात विनोदी भूमिका करणारा जाड्या तिच्या डोळ्यातच नव्हे तर मनात भरलेला! सात समुंदर पार न जाता त्याच्या पीछे पीछे ती त्याच्या गावी आलेली.. मुंबईत!

"अरे वजन कमी व्हायला कारण म्हणजे ती ग्रँड ज्युनियर क्वीन आठवते.."

"आठवते? पण कोण कोण आठवाव्यात? शीला शाह की नीला सहस्त्रबुद्धे.."

"की मनाली.. की सोनाली?"

"श्यामल की मोहिनी?"

"अरे वा! रिव्हिजन करताहात? पण सरप्राईझ वेगळेच आहे! रूपा! रूपा रूपवते!"

"क्काय? ती? आणि तिचा तुझा काय संबंध?" रड्याच्या प्रश्नावर चमच्या म्हणाला,

"लेट मी गेस अगेन! स्वप्नात आली असणार! बरीक म्हणाली असेल, थोडासा तरी बारीक हो, बरा दिसशील बरे!"

"नाही.. हा गेला असणार तिला प्रपोझ करायला.. ती म्हणाली असणार, आरशात पाहिलंयस स्वत:ला कधी?"

"मग आमच्या हीरोला काय म्हणतात ते.. उसका आत्मसम्मान का काय तो जागा झाला.. बघच.. बारीक होऊन दाखवतो की नाही म्हणत चॅलेंज स्वीकारला याने!"

"अरेरे.. सत्य हे कल्पनेहून जास्त अकल्पित असतं.. तेव्हा हे पहा.."

जाड्याने आपल्या बॅगेतून एक पाकिट काढून बाहेर ठेवले.

"क्काय? लग्नाचं आमंत्रण?"

दोघांनी ती पत्रिका आलटून पालटून पाहिली. वाचली. पचनी पडेतोवर वाचली..

पंधरा दिवसांनीच जाड्या वेड्स रूपा! अर्थात पत्रिकेत त्याचं ओरिजिनल नाव होतं.

"आता नो मोअर गेसेस! हे खरंय! आणि वजन कमी करायला मोटिवेशन पण तीच हे पण खरंय!"

"मोटी नाही मोटावेशन म्हण!"रड्या ने कोटी करण्याचा प्रयत्न केला.

"तर माझ्या मागोमाग रूपा आमच्या कंपनीत आली काय.. मग.."

"नैन लड गए है.. मनवामा कसक होइबे करी?" परत रड्याचाच स्वर!

त्यावर चमच्याची प्रति कोटी..

"बेकरी? इथे बेकरी कुठून आली?"

तिकडे दुर्लक्ष करत जाड्या आपली प्रेमकथा कथन करायला लागला.

"अरे, तसंच नाही काही. पण त्या दिवशी खूप पाऊस झालेला मुंबईत. ऑफिसात अडकलो काही जण. त्यात रूपा पण होती.."

"आता मला हिंदी सिनेमाची आठवण येतेय.. बाजूला शेकोटी जळतेय.."

"ऑफिसात शेकोटी?"

"अंधार झालाय.. विजा कडाडताहेत.. मग हीरो आणि हिरवीण.. रूपा.. रूप तेरा मस्ताना.."

"थांब! कल्पनेच्या घोड्यास लगाम घाल! पण जे झाले ते त्याच रात्री! रात्रभर ऑफिसात बसून होतो. बाहेर धुवांधार पाऊस. रूपा होती माझ्याबरोबर. भर रात्री म्हणाली, एक सांगायचंय! म्हटलं सांग.. तर चक्क म्हणाली, तू मेरा हीरो है! अगदी कॉलेजच्या दिवसांपासून. मी तीन ताड उडालो. म्हटलं, आम्ही कधी कल्पनाही केली नसती! मग म्हणाली, सगळं छान आहे पण फक्त एक ते वजन कमी कर!"

"मग लगेच चला मुरारी हीरो बनने?"

"साल्या, रूपा आधीच हो म्हणाली असेल तर वजन कमी करणं म्हणजे.. किस झाड की पत्ती!"

"मग तुझे आईवडील ही तेच सांगत असणार. नि आम्ही तरी काय वेगळं सांगत असायचो?" रड्याच्या प्रश्नाला टोलवत जाड्या म्हणाला,

"तुमची गोष्ट वेगळी बाबांनो! मोटिवेशन कसं हवं? तर असं! नाहीतर तुम्ही लोकं!"

"म्हणजे खरंच!" रड्या म्हणाला,"रियली! मोटिवेशन नव्हे! तर मोटावेशन!"

चमच्या तोवर आपल्या कल्पनाशक्तीला ताणत असावा.. म्हणाला,

"ती, जवळगे जवळ घे मला म्हणाली?"

जाड्याचं ओरिजिनल नाव जतीन जवळगे आणि चमच्याला ते अजूनही आठवत होतं!

रड्या आणि चमच्या रीतसर मुंबईत जाड्या-रूपाच्या लग्नाला आले. दोघांनी त्यांना मोठालं कॉमन वेडिंग गिफ्ट ही दिलं..

"गिफ्टवर काय लिहूया? डिअर जाड्या?"

"नको! खरं नाव घालू.."

"का? अरे, कसा ही असला तरी आपल्यासाठी तो जाड्याच आहे!" रड्याचा युक्तिवाद.

"असं म्हणतोस? खरंय! मुलं कितीही मोठी झाली तरी आई वडलांसाठी लहानच असतात! तसेच हे! जाड्या नेहमीच आपल्याकरता जाड्याच राहिल!"

शेवटी ठरलं..

लग्नाच्या मोठाल्या भेटीवर "प्रिय जाड्यास.." लिहिलं गेलं..

जाड्याचं ते गिफ्ट आता कुठे ते त्याला ठाऊक नाही पण बाहेरचा जाडजूड मोठा बॉक्स मात्र त्याने अजूनही जपून ठेवला आहे, त्यावरील 'प्रिय जाड्यास' ह्या लेबल सकट!

# अ-माणूस

गोष्ट फार दिवसांपूर्वीची आहे. पण म्हटली तर आजची पण म्हणता येईल.

धनबाद नगरातली गोष्ट. धनबाद नगर पूर्वीच्या कंगाल गावांसारखे नाही. नावाप्रमाणेच श्रीमंती असणाऱ्यांचे नगर ते. श्रीमंती म्हणजे पैशांची. पैशाशिवाय जगात मोठं काही नाही. पैसा हा देव नसेल पण देवापेक्षा कमी देखील नाही हे तत्वज्ञान हाडीमाशी खिळलेली जनता. अर्थात एकूण देशाची श्रीमंती सरासरीत मोजली जात असते. तेव्हा या 'सरासरी' श्रीमंतीच्या पायाशी असणारे गरीबही होतेच. असणारच. कारण त्यांचाच तर आधार घेत श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत होत असतात.

तर अशा श्रीमंती पिरॅमिडच्या तळाशी असणारे धनबाद नगरातले रहिवासी तातोबा नि अंजनाबाई. एक झोपडी, छोटा जमीन तुकडा, त्यावर राबणारे हात नि पावसाच्या कृपेसाठी आकाशाकडे कायम लागलेली नजर. संसारात वेलीवर फुलांसारखी मुले उमलतात ती सुखवस्तुंच्या घरी. इकडे नुसतीच जन्म घेतात. तशा गरीबाघरी दोन धनाच्या पेट्या आल्या, कला आणि माला. मग विविध देवांना नि देवींना नवस बोलून बोलून मागून घेतलेला कुलदीपक, सुरेन्द्र. मुलगा तसा हुशार. हरहुन्नरी. गावाकडच्या  वातावरणात विसंगत. अभ्यासात पुढे नि सदैव पुढे पाहणारी नजर. कुठल्याही आईबापास अभिमान वाटावा असा. हा गरिबीतून बाहेर काढेल याची खात्री तातोबाला होती. त्यातून पोटाला चिमटा काढत केलेले त्याचे शिक्षण.

सुरेन्द्र वाढत होता. हुशार होता. अभ्यासात मागे नव्हता. नि मेहनतीत कमी नव्हता. या दरिद्री जगातून बाहेर पडायला एकच उपाय.. शिक्षण. त्याने लवकरच हे शिकून घेतले. शिका आणि मोठे व्हा. शिका आणि गरीबी हटवा. हे शिकत शिकत तो मोठा होत गेला. तातोबा नि अंजनाबाई कवतिकाने बघत होते. पोर पांग फेडेल याची लक्षणं दिसत होती. सुरेन्द्रही बापाच्या पोटाच्या चिमट्याची पर्वा न करता पुढे जात होता. गावच्या शाळेतून मग तालुक्याच्या मोठ्या शाळेत. तिकडून शहरात. पुढेच चाललेला सुरेन्द्र. तातोबा कर्ज काढतोय. सुरेन्द्र बापाचे ते कर्तव्यच आहे म्हणत तिकडे कानाडोळा करतोय..

दिवस जात होते. तातोबा रापलेली कातडी घेऊन घाम गाळत होता. अंजनाबाई पुढे वाढून ठेवलेल्या सुखाच्या कल्पनेने सुखावत होती. सुरेन्द्रही हळूहळू शहरी वातावरणात रुळत होता. रूळता रूळता मोठी स्वप्ने पाहात होता. नि सगळी स्वप्ने धनबादच्या प्रथेप्रमाणे नि परंपरेनुसार धनाशी संबंधित होती.

त्यात तातोबाच्या आयुष्यात कधी नव्हे ती एक सुखद घटना घडली. पैसा हाच देव मानणाऱ्या धनबाद नगरात लॉटरीचे पेव फुटणं साहजिकच होतं. त्यातली एक लॉटरी तातोबाच्या नावाला फुटली.. रातोरात तातोबाचे दिवस बदलले.. सुरेन्द्र मनोमन खुश झाला. त्याच्या स्वप्नांना भरारी घेणं सोपे झाले. तातोबाने तातडीने कर्ज फेडले. बाजूलाच नवीन मोठे घर झाले. शेती वाढवली. एकूण लक्ष्मी कृपा झाली चांगलीच. सुरेन्द्र पाहात होता. त्याच्या डोक्यात सुबत्तेची स्वप्ने आकार घेत होती. त्यासाठी त्याला आता परदेशाची ओढ लागलेली. तातोबाच्या पालटलेल्या दिवसांनी हे जरा सुलभ झालेले.

काही वर्षे गेली. सारे काही योजनेनुसार चाललेले. सुरेन्द्र आता नोकरीस लागलेला. त्याचा सहा आकडी पगार.. मग परदेशी प्रस्थान. तिकडेच मिळालेली जोडीदार.. एलिझाबेथ. आता त्याच्या पुढच्या योजनेच्या अंमलबजावणीची वेळ झाली. परदेशात लग्न उरकून घेतलेले.

घरी आईबापास त्याची खबर कळवली. नि एका महिन्याची रजा टाकून सुरेन्द्र खास आईबापास भेटावयास आला..

"काय वं? सुरेनला आटवन आली म्हनायची. तुमी उगा कावत होते.. पोर इसरला म्हनून.."

"नसेल इसरला. पन इतक्या वरसात का येतोय पाहाया नको? लगीन केलं ते बी न सांगता.. आपन काय न्हाई म्हननार होतो?"

"नसंल सांगितलं. त्या गोऱ्या देशात आपन हे काळे करपलेले. नसेल वाटलं बोलावं नि बोलवावं.."

"काय बी असू दे.. जास्त आशा लावून बसू नगंस. आशा लावली की तिचा भंग होतो नि दु:ख पदरात पडतं.."

"गपा जरा. उगा तत्वज्ञान पाजळू नगा. पोर येतंय त्याचा आनंद माना न फाटे फोडू नगा.."

"ऱ्हायलं.. पाहू काय करतो ते.."

मधली कित्येक वर्षं आईबापाची आठवण न आलेला सुरेन्द्र वेळ काढून धनबादला पोहोचला. आईच्या नजरेत तो वाळलेला नि बापाच्या दुनियादारी पाहिलेल्या नजरेत तो वरवर काळजी दाखवणारा नि आतून काही वेगळा असा दिसत होता. गावी पोहोचला तर सुरेन्द्र आईबापाशी प्रेमाने वागत होता.

"आये.. किती दिवसानी येता आलं. तिकडे एक दिवस असा नाही की आठवण येत नव्हती पण जमेल तर. नोकरीचे नियम कडक फार.."

"पन बराहेस ना बाबा. तब्येत सांभाळ. सूनबाई कशीय?"

"ती चांगलीय आये. येणार म्हणत होती पण तिला सुट्टी नाही मिळाली. मग म्हटलं मीच येऊन जातो. तात्या पण किती थकले. तुझ्या हातचा भाकर तुकडा खाऊन किती वर्षं झाली.. तुझ्या हातची चव कशाला नाही आये.."

आईच्या काळजाला हात घालायला दोन वाक्य पुरेशी होती..

"म्हनलं व्हतं तुम्हास्नी. ग्वाड पोर माजं.. उगा काहीबाही बोलता.. बिचारा इत्ती वरसं एकला ऱ्हायलाय. घरचं चांगलं चुंगलं खायाला न्हाई न काय न्हाई. मायेला पारखा झाला माझा पोरं आपन जिते आसूनबी.." अंजनाबाई तातोबाला

म्हणाली. तातोबा यावर चुप्प बसून राहिला. बायको म्हणते ते खरं असेल ही.. तरीही येण्यामागे काही कारण असणारच..

दोनचार दिवसात मग विषयाला हात घातला गेला नि पुढची बोलणी सुरू झाली. अगदी काळजाला हात घालणारी.

"आये अन तात्या.. तुमच्यापास्नं दूर ऱ्हाऊन आता किती वर्षं झाली. आता नाही राहवत.."

"म्हंजे रं? तू परततो काय? मग तर छानच फार.."

"मी नाही. आये तुम्हीच या तिकडे."

"आम्ही गावंढळ. तिकडं यून काय करनार?"

"ते मी पाहून घेतो. हे घर विकू. शेती विकू. माझ्याबरोबर चला. तिकडे वेगळी दुनिया आहे. उरलेलं आयुष्य आरामात घालवा.. किती वर्षं कष्ट करणार अजून?"

तातोबाच्या हृदयात कालवाकालव झाली. हे घर सोडावं, शेती विकावी नि दूर कुठल्या देशी जावं जिथे कुणी ओळखत नसावं. एखादा वृक्ष उपटून दुसरीकडे लावता येतो असा?

"तुमचं आपलं काय पन. पोराला शाळंपास्नं घराबाहेर ऱ्हावं लागलंय. त्याला वाटतं थोडं आईबापापाशी ऱ्हावं. तर न्हाई का म्हनता?"

"असं? मग यू दे की त्याला इकडं.."

"तो असा कसा यील? नोकरी हाए तिकडं.."

अशी भवति न भवति झाली. बापाच्या व्यवहारी दृष्टीवर आईच्या काळजाने मात केली. काही दिवसात सौदा पक्का झाला. शेजारची जुनी झोपडी वगळता

सारे विकून पैसा गोळा झाला.  आईबापाची तात्पुरती सोय झोपडीत लावून बहिणींना सुगावा लागू न देता सुरेन्द्र परदेशी निघाला..

"आये.. थोड्याच दिवसांची गोष्ट आहे. मी परत येतो. लगोलग तुम्हांला घेऊन जातो. आताच नेलं असतं पण तुमचे कागदपत्र बनवायला वेळ लागेल.. सुट्टी कमी पडतेय आता. परत आलो की निघू आपण.. तयारीत रहा.."

पैशाच्या राशी घेऊन पोर परदेशी निघालं परदेशी नि तातोबा नि अंजनाबाई परतले ते जुन्या झोपडीत.

या गोष्टीला त्यानंतर काही दिवस लोटले.. महिने लोटले.. वर्षं सरली. सुरेन्द्रचा पत्ता नाही. तो परदेशात पैशांच्या राशी कमावून त्यावर लोळतोय. मोठं घर नि शेती गमावून तातोबा नि अंजना भिकाऱ्यासारखे राहताहेत झोपडीत.. आईच्या हृदयात पोराची काळजी अजून देखील आहे. बाप आतल्या आत धुमसत दिवस काढतोय, स्वत:च स्वत:चं हक्काचं शेत नि घर विकून. कोणत्याच कायद्यानुसार पोरगा गुन्हेगार नाही. त्याला करणार काय?

धनबादेत पैसा हेच सर्वस्व मानणाऱ्यांची चलती होती. ना बाप बडा ना भय्या.. सबसे बडा रूपय्या या तत्वज्ञानास मानणारे सारे.. आजही ही सुरेन्द्रची गोष्ट गावकरी एकमेकांना सांगतात.

- आणि सुरेन्द्रच्या प्रगती नि उत्कर्षाबद्दल बोलताना गावचे लोक आजही भारावून जातात..

# कर्ण

ट्रान्झिस्टरवर कुठलं तरी गाणं वाजत होतं. त्या आवाजाने मी डोळे उघडले तेव्हा बाई आत शिरल्या. बाईंचा एक इशारा झाला की सारी मुलं पटापटा कामाला लागत. साडेसाताला प्रार्थना होई. तेव्हा मला घड्याळ कळायचं नाही. पण बाईंचा आवाज आला की समजायचं पटापटा सारं आटोपून हॉल मध्ये यायचं. हात जोडून डोळे मिटून प्रार्थना झाली की मग खाण्याची वेळ व्हायची. जगात सारी मुलं अशीच खाण्याआधी प्रार्थना म्हणत असतील का? मला प्रश्न पडायचा. पण तो थोडा नंतर नंतर. म्हणजे थोडा मोठा झालो मी आणि मी राहतो त्याबाहेर ही जग आहे हे समजले त्या नंतर. तोवर माझे जग तसे मर्यादितच होते. एक मोठी बिल्डिंग. त्यात तीनचार मोठाल्या खोल्या. त्यात टाकलेले पलंग.

बाहेर मोठालं पटांगण. त्यात सुकलेलं गवत. एक चिंचेचं झाड नि त्याभोवतीचा पार. त्या बिल्डिंगीतल्या एका अंधाऱ्या खोलीत बसलेले एक साहेबासारखे दिसणारे कुणीतरी, एक इकडून तिकडे धावत जाणारा खाकी कपड्यातला नारायण.. तो तसा चांगला होता. एकेका मुलाला पकडून हळूच खाऊ द्यायचा. प्रेमाने बोलायचा. आणि एक चष्मा जाडजूड लावणाऱ्या बाई. त्यांचा आवाज एकदम कडक होता. मी लहान होतो तेव्हा कधी कधी बाई स्वप्नात देखील येत नि मी दचकून जागा होई.

तसं जग मर्यादित होतं आमचं. प्रार्थना झाली की बाहेर मैदानात खेळायला जायचं. मग जेवणाची वेळ. मोठी मुलं मध्येच कधी कधी पुस्तकं वाचायची. दुपारी ती गेटच्या बाहेर 'शाळेत जातो' म्हणून जायची. संध्याकाळी परतल्यावर उगाच शाळेच्या गंमती सांगायची. त्यातून कळायचं ते हेच, की आपल्यासारखी मुलं बाहेर देखील आहेत. नि बाहेर एक मोठं वेगळं जग देखील आहे. शाळा नामक गोष्टीत कधीतरी आपल्याला जावं लागेल.. मोठया मुलांसारखी पुस्तकं वह्या मिळतील.. नि त्यापेक्षा जास्त महत्वाचे म्हणजे तेव्हा आपल्याहून छोट्या पोरांना शाळेच्या गोष्टी सांगून भाव खाता येईल.. याची मी वाट पाहात होतो.

पटांगणात एक मोठं चिंचेचं झाड होतं. माझं आवडतं. बाकी कुणाला त्यावर चढायला येत नसे. पण मी सरसर चढून जायचो. माझ्या बरोबर नेहमी माझा मित्र एकनाथ असायचा. त्याला चिंचा आवडायच्या. दोघं मिळून चिंचा खाऊन दात आंबले की परतायचो.

पण बाईंच्या नकळत. एकनाथ नि माझ्या खूप साऱ्या गप्पा व्हायच्या. त्याला म्हणे आई होती नि एक वडील देखील. मग काय झालं ठाऊक नाही पण तो इकडे येऊन पोहोचला. मला तर आई वगैरे होतं की नाही तेच ठाऊक नव्हतं. इकडे एक बाई असायच्या, ज्यांची फक्त भीती वाटायची. नारायण सोडून बाकी

दोनचार मोठी माणसं असायची. त्यात तो नारायणच आमच्याशी प्रेमाने बोलायचा. पण बाकी तशी आम्ही पोरं मजेत असायचो. या जगाखेरीज अजून काही असू शकते हेच माहिती नसल्याने असेल कदाचित.

बाहेर राहणाऱ्या मुलांना स्वत:चं घर असतं हे मला नंतर कळलं. म्हणजे शाळेत जायला लागल्यावर. नारायण त्या शाळेला झेडूपीची शाळा म्हणायचा. पुढे थोडं वाचता यायला लागल्यावर आमच्या बिल्डिंगीवर 'वात्सल्य अनाथालय' अशी पाटी वाचली. नावातले दोन्ही शब्द कळले नाहीत.. नारायणाला विचारलं तर एकदम गप्प झाला तो.. म्हणाला, 'कळेल मोठा झाल्यावर.'

त्यावेळी एक कळलं, एक म्हणजे मी देखील मोठा होणार आहे. दुसरं, जगात अजून कळून घेण्यासारख्या गोष्टी बाकी आहेत. शाळेत जायचो तेव्हा बाहेर जग दिसायला लागले. कितीतरी पोरं जगात अजून आहेत. एकेका पोरापोरीला स्वत:चे असे आईबाप आहेत. पोरं घरी जातात नि घरून परत येतात. बहुतेकांचं बोट धरून शाळेत आणायला त्यांची एक आई असते. एकदा असाच एक मुलगा धावताना पडला तर त्याची आई धावत आली. त्याला जवळबिवळ घेऊन बसली. मी त्या चिंचेच्या झाडावरनं पडलेलो तेव्हा ढोपर फुटलेलं. इकडच्या बाई मी पडलो म्हणून मारतील म्हणून जखम लपवून ठेवलेली ते आठवलं. कां कोणास ठाऊक आयुष्यात पहिल्यांदा रडायला आलेलं तेव्हा.

मग एक मोठा धक्का बसला. एकनाथला घ्यायला कुणीतरी आलं. म्हणाले, दत्तक घेताहेत त्याला. दत्तक म्हणजे न एकनाथला ठाऊक न मला.. नारायणला विचारलं तर तो परत एकदम गंभीर झाला.. बोलला काही नाही..

म्हटलं हे काय ते ही मोठा झालो की कळेल बहुतेक. फक्त मोठं व्हायला किती वेळ लागेल तेच माहिती नव्हतं. एकदा ते पण विचारलेलं नारायणला, तर म्हणालेला, कसली घाई आहे? लहान आहेस तोवरच ठीक. दुनिया खूप खराब आहे म्हणाला. दुनिया म्हणजेच जग हे नंतर कळलं मला. आणि ही दुनिया किती मोठी आहे याचा काही अंदाज मात्र आला नाही.

एकनाथ सोडून जाताना रडला खूप. मला पण रडू आलं, पण ते कां ते मात्र कळलं नाही. नारायण म्हणाला असता कदाचित, मोठा होशील तेव्हा कळेल.

मग थोडा थोडा मी देखील मोठा होत गेलो. म्हणजे आधी नारायणाच्या गुडघ्यापर्यंत यायचो तो त्याच्या कंबरेपर्यंत हात पोहोचायला लागले. नारायणही कधी वेळ मिळाला तर हाताला उचलून गरगर फिरवायचा. एकदोनदा कडेवर उचलूनही घेतलेलं. बाकी बरोबरची पोरं मागोमाग लाइन लावून असायची. मग एकेकाचा नंबर यायचा. हे सगळं त्या बाई नसायच्या त्या दिवशी फक्त. बाकी दिवशी बाई जाड चष्म्याआडून करड्या नजरेने बघत असायच्या.

शाळेत तशी मजा असायची. मुख्य म्हणजे त्या निमित्ताने बाहेर जायला मिळायचे. शाळेतल्या बाई इकडच्या बाईंपेक्षा बऱ्या होत्या. शिकवायच्या काही बाही. मारायच्या मात्र कधीच नाहीत. रागावल्या की नुसता कान धरायच्या. आमच्या इकडच्या बाईंच्या रागापुढे ते कान धरणं म्हणजे काहीच वाटायचं नाही. हळू हळू जग कळत होतं. बाहेर मुलं मुली आहेत. मोठी माणसं आहेत. त्यात काही चांगली देखील आहेत. नारायणाहून नसतील पण तशी बरी म्हणावीत अशी आहेत. पण बाकी सारी आमच्या इकडच्या बाईंसारखीच कडक. नारायण मध्ये मध्ये सांगायचा, अभ्यास कर. मोठा हो..

म्हटलं अभ्यास नि मोठे होण्याचा संबंध काय असावा? प्रश्न पडायचा पण विचारायचो नाही. नारायण एकतर गप्प बसेल, नाहीतर कळेल मोठेपणी म्हणेल.

पण तो म्हणायचा म्हणून त्याच्याकरता पाटीपेन्सिल घेऊन बसायचो संध्याकाळी खेळून झाल्यावर. ते पाहिलं की नारायण खूश व्हायचा. तो खूश व्हावा म्हणून थोडा थोडा अभ्यास करायचो मी.

मग एके दिवशी मला खाली ऑफिसात बोलावणं आलं. कुणीतरी दोघे जण मला पाहून हसले. आमच्या कडक बाई देखील पहिल्यांदाच थोड्याफार हसताना दिसल्या..

त्या रात्री नारायण मला घेऊन बसला. का कोणास ठाऊक तो मध्येच हसायचा मध्येच गंभीर व्हायचा. उद्या मी पण दत्तक जाणार होतो म्हणाला.. यावेळीस बोलला पण सगळं.. दत्तक म्हणजे मला नवीन आईबाबा मिळणार. माझं म्हणायला घर मिळणार. नवीन शाळा पण.. आज आलेले ते दोघं म्हणजे माझे नवे आईबाबा..

"नशीबवान आहेस पोरा. घर मिळालं तुला.. आता नवीन घरी नीट रहा.. मोठा हो.. अभ्यास कर.."

नवीन आई बाबा म्हणजे? आधीपण होते कधी मला? मी विचारलं नाही.. नारायण तंद्रीत बोलत होता,"पोरा, मला आई आहे.. होती. बाप कोण ठाऊक नाही.. आईला मला ठेवणं शक्य नव्हतं म्हणून असेल, सोडून गेली एक दिवस त्या चिंचेच्या झाडाखाली. कर्ण ठाऊक आहे तुला महाभारतातला? त्याच्यासारखा मी. पण त्याला कवचकुंडलं होती. माझ्याकडे काय आहे? हे अनाथालयच तेव्हापासून माझं घर. तुमच्यासारखी पोरं हेच माझे घरातले लोक. तुमच्यापैकी कुणी दत्तक जातो तेव्हा मन भरून येतं.. उद्या तू देखील जाशील.. या नारायणाला विसरू नकोस पोरा.."

नारायण बोलत होता. इतका बोलताना पहिल्यांदाच ऐकत होतो मी. माझ्या लक्षात त्यातलं आलं ते इतकंच, नारायण लहानपणापासून इथेच आहे. नि माणसं अशीच मोठी होत जातात..

सकाळी मला घेऊन जायला आले तेव्हा सगळे होते.. एक नारायण सोडून..

*****

ट्रान्झिस्टर तसा आऊटडेटेड होऊन कितीतरी वर्षं झाली. माळ्यावर सापडला एक. चालतो का पहावा म्हणून टाकली बॅटरी तर बेटा 'हम अभी जिंदा है' म्हणत गाणं वाजवू लागला.. तेच.. कित्येक वर्षांपूर्वीचं.. ते अनाथालय आठवले.. नारायणाची आठवण झाली. नारायणाच्या आठवणीने मन कातर झालेलं.. उठलो, ऑफिसला फोन केला, म्हटलं दोन दिवस सुट्टी..

आता 'वात्सल्य अनाथालय' नावातील दोन्ही शब्दांचा अर्थ नीट कळतोय. त्या लहानपणात वात्सल्याचा अनुभव देणारा नारायण आता कसा असेल? इतकी वर्षे मी त्याला विसरलो कसा? पण विसरलो नाहीच. तसं असतं तर आज कसा काय परतलो असतो त्या ठिकाणी?

पोहोचलो तर ती वास्तू आठवणीतल्यापेक्षा वेगळी वाटत होती. चिंचेचं झाड तोडून तिथे नवीन इमारत आलेली. समोरचं पटांगण आक्रसलेलं.. नि माझी गाडी पाहाताच समोर आला तो खाकी कपड्यांतला नारायण. मी इकडून गेलो तेव्हा दहा वर्षांचा होतो. आज पंधरा वर्षांनी नारायणात चांगलाच बदल झालेला..

"काय नारायण? ओळखलंस?"

नारायणाने डोळे बारीक केले.. एकाएकी ओळख पटली असावी.. त्याच्या चेहऱ्यावर हसू नि डोळ्यातं पाणी आलं..

मग आम्ही गप्पा मारत बसलो. आधी हालहवाल विचारून झाली. माझी गाडी नि चांगले कपडे पाहून तो समजून गेला असणारच. इतक्या वर्षांनी नारायण अजून ही तिथेच होता..

"तुम्हाला काय सांगू.." नारायण म्हणाला आधी.. मी म्हटलं,"नारायण, तुम्हाला काय? अरे, तूच लहानपणी माया लावलीस.. आता तुम्हाला वगैरे काय .."

"पण ही गाडी.. मोठा साहेब झाला दिसतोस.."

"मोठा झालो तू म्हणालास तसा. नशिबाचा खेळ.."

"हुं.. नशिबाचा खेळ!" का कोणास ठाऊक त्याच्या बोलण्यात थोडा कडवटपणा होता. आई असूनही अनाथ असल्याने असावा कदाचित.

"असतं एकेकाचं प्राक्तन. पण मी खूश आहे इकडे.. पोरं येत राहतात. डोळ्यासमोर मोठी होतात. आपण माया लावायची फक्त. पोरांना दुसरं काय हवं असतं त्या वयात.. येणारी पोरं पण वाढली. नवी इमारत झाली.. थोडीफार दत्तक जातात.. बाकी इकडे मोठी होतात. नि मग ह्या बाहेरच्या जगात जगायला बाहेर पडतात.. एकेकाच्या नशिबात असेल तसं मिळतं आयुष्य.. बाकी आपल्या हाती काय आहे?"

एकाएकी मला नारायणाची दया आली. अनाथ नसूनही अनाथ नारायण. वयाची चाळीशी आली तरी इथेच.. वाटलं याला घरी घेऊन जावं. आमच्या मोठाल्या बंगल्यात त्याला एक हक्काची खोली द्यावी..

"नारायणा, तू माझ्याबरोबर चल.. हक्काने. आमच्या घरात रहा. दया म्हणून नाही. उपकार म्हणून नाही.. नाही म्हणू नकोस.."

मी म्हणालो. नारायण आता काय बोलेल? मला स्वत:ला हे बोलून बरं वाटत होतं..

"मी? मी नाही!"

"का?"

"माझ्या नशिबात ते नाही.."

"असं थोडीच असतं.."

"असंच असतं राजा."

"तरीपण.. तुला विसरलो नाही अजून.. एक तूच तर होतास आधार.."

"ते राहू देत. पण एक कर.. जमेल तेव्हा जमेल तसं या सर्वांतील एखादं बाळ दत्तक घे.. यांपैकी एखाद्याचं नशीब बदलताना पाहू दे मला.."

"पण तू.."

"इकडची सगळी व्यवस्था अजून तशीच आहे. इमारत आहे, पैसा येत राहतो.. पोरं आहेत.. स्टाफ आहेत.. पण या कोवळ्या जीवांना माया लावणारं नाही कुणी.. सगळे नियमाप्रमाणे कामं करतील.. या सगळ्या चिमुकल्या जीवांना सोडून मी एकटा येणार नाही.. पण जमलं तर एखाद्या बाळाला हक्काचं घर मिळू दे.."

"पण तू किती वर्षं.."

"यातच माझं सुख आहे. माझ्या आता न आठवणाऱ्या आईने इकडे सोडलं तेव्हाच हे काम माझ्यासाठी हे ठरलं असणार. कर्णाला सोडलं कुंतीने, बिचाऱ्याला कौरवांची बाजू घ्यावी लागली. त्यापेक्षा माझं बरंय.. हो की नाही?"

तिकडून निघालो..

नारायणाचा विचार मनातून जाईना. म्हटलं लहान लहान सामान्य माणसं विचाराने इतकी मोठी असू शकतात? नारायणाने आपल्या हातातोंडाशी आलेला ऐषोआरामाचा घास सहजी सोडून द्यावा. कर्णासारखा तो कमनशीबी.. आणि दानशूर कर्णासारखे त्याने आपल्या जीवनाचेच दान द्यावे? चिमुकल्या अनाथ बाळांना सांभाळण्याची नोकरी एखाद्या व्रतासारखी करावी? कदाचित हे संवेदनशील मन हेच त्याचे कवचकुंडल असेल ज्यामुळे इतका कठोर संघर्षही त्याच्यावर वार करू शकला नसावा?

*****

नुकतंच आमच्या घरी नव्या बाळाचं आगमन झालंय.. वय वर्षे दोन. वात्सल्य अनाथालयातून त्याला आणताना नारायणाच्या चेहऱ्यावरचे वात्सल्य ओथंबून आलेलं पाहिलं.. खरोखरीची कवचकुंडलं असल्यासारखा त्याचा चेहरा तेव्हा तेजाने चमकत होता ..

# धनेश

धनेश धानोरकर. शाळेतला माझा मित्र कित्येक वर्षांनी भेटला तो त्याच्याच ऑफिसात. आमची शाळेतली एकाच बाकावर बसणारी जोडी. मी ज्ञानेश नि तो धनेश. आमची जोडी अन जोडीने काढायच्या खोडी. मी पहिल्या नंबरात येणारा म्हणून हुशारात गणला जायचो तर तो शेवटून पहिला. त्यामुळे अशी जोडी जमलेली पाहून पोरं म्हणायची, अशी खोडी काढणारी जोडी.. पाहून पडलीय कोडी!

शाळेनंतर तो पुढे शिकला वगैरे नि मग सरकारी नोकरीत लागला. पूर्व पुण्याई वगैरे नसते म्हणणाऱ्या नास्तिक ढुढ्ढाचार्यांना त्यांचा विचार बदलायला हे एक उदाहरण पुरेसे होतं. सरकारी नोकरी नावाचे गुलबकावलीचं फूल हाती लागणं फक्त पूर्वजन्मीच्या पुण्यवंतांच्याच नशिबी असतं.

त्याचं ऑफिस तसं बरं होतं. म्हणजे मोठी जागा. तिथे टेबलामागून टेबलं लावलेली. कर्मचारीवर्ग खुर्चीवर बसलेला. त्यातील काहींनी बसण्याच्या जागी उशी ठेवलेली. दुपारी जेवणानंतर तीच काढून टेबलावर ठेवली की टेबलकुक्षी करताना टेबलाचं लाकूड टोचत नाही.

हे ज्ञान मला तिकडे गेल्यावर झालं. आजूबाजूला काही लाकडी केबिन्स. हे साहेब लोकांसाठी. त्यांना खास केबिन असल्याने तशी दुपारी निवांत झोप येऊ शकते. हे ही ज्ञान मला त्याने दिलं. अशा निवांतपणासाठीच तर सारे साहेब होऊ इच्छितात म्हणे. थोडाफार पगार पण जास्त मिळतो, पण मुख्य मुद्दा तो नाही, तर जेवढी  पोस्ट वरची तितकी वरकमाई जास्त. सर्वमान्य नि जगन्मान्य आहे ही बाब.

"धन्या, धन्य तुझी. उघडपणे सांगतोयस सारं?"

"हात्तिच्या! हातच्या कांकणाला आरसा कशाला? बरोबर आहे ना म्हण? तू आमचा स्कॉलर. मराठीचा टॉपर!"

त्याच्या म्हणीबद्दल काहीच न म्हणता मी म्हणालो,"अरे, पण लाचलुचपत वगैरे अंडर द टेबल बाबी. कुणी उघड बोलतं त्याबद्दल?"

"तो जमाना गेला यार!"

"कधी नि कुठे?"

"आता दिवस बदलले. जमाना बदलून जमाना लोटला! आहेस कुठे? न्यू नॉर्मल जमाना आहे हा!"

जमाना बदलल्यास जमाना लोटला? मला पत्ता ही नसावा?

"म्हणजे काय?"

"चल. तुला दाखवावेच लागेल सगळं. अभ्यासात इतका पुढे तू, दुनियादारीत इतका मागे?"

न्यू नॉर्मल जमान्यात त्याचे ऐकून घेणे भाग होते..

"चल.."

मनातल्या मनात 'दुनियादारी पडेगी निभानी' गुणगुणत त्याच्याबरोबर निघालो.

आम्ही त्याच्या कँटिन मध्ये गेलो.

'खाना महल' अशी पाटी, पण कँटिन कसलं, चहाची टपरी होती नुसती. मेन्यू वगैरे काही नाही. नुसताच चहा. पण सगळीकडे कर्मचारी चहात बुडवून खारी बिस्किटं खात होते. ती ही आपल्या खिशातून काढत.

"ही खारी बिस्किटं? खिशातून आणतात आणि एकजात सारे खाताहेत?"

"नीट बघ. बिस्किटं नाहीत ती.."

मी पाहिलं. खारी बिस्किटं नव्हती. तशाच दिसणाऱ्या कागदाच्या थप्प्या होत्या. सरकारी ऑफिसात कर्मचारी पैसे खात होते. चहात बुडवून.

"अरे, इथे हेच चालतं. पैशांच्या थप्प्या आहेत त्या. दिसायला खारी बिस्किटासारख्या आहेत सगळ्या.."

"सगळे हेच खातात?"

"हो. पण नीट पहा. एक शिस्त आहे इकडे. हायरार्की म्हण. शिपाई लोक एक रूपयापासून वीस रूपयापर्यंतच्याच नोटा खातात. क्लार्कना शंभर रूपयांच्या थप्प्या अलाऊड आहेत. हेड क्लार्क अँड अबव्ह.. पाचशेच्या नि सिनियर वन्स.. दोन हजाराच्या! हव्या तितक्या खा पण डिनॉमिनेशन चुकायला

नको. चिल्लर वगैरे चालत नाही अजिबात. नाणी कशी खाणार कोणी होय की नाही?

"खरंय!"

"शिस्त म्हणजे शिस्त!"

"पण मग पगाराचं काय?"

"अर्थात. तो मिळतोच. पण तो खाता येत नाही. दुसरीकडे वापरावा लागतो. हां, एक आहे, तो दुसऱ्या एखाद्या सरकारी ऑफिसात खाऊ घालायला उपयोगी पडू शकतो."

"पण ही सिस्टीम कळत नाही मला. म्हणजे कामं होतात कशी? सगळे तर इकडेच बसलेले आहेत.."

"अरे, ही प्रिपरेशन फेज आहे. एकेक कर्मचारी येतात. खुराक खातात.. मग.."

"मग काय?"

"शेजारच्या रूम मध्ये.. चल तुला दाखवतो.."

बाजूला एक मोठा हॉल होता, 'पाचन महल'. तिकडे आरामखुर्च्या रांगेत टाकलेल्या. एकेक कर्मचारी डोळे मिटून आरामात बसलेला. कुणी ढेकर देतोय. कुणी ढेरीवरून हात फिरवतोय. काही शतपावली करताहेत.

"हे बघ. हा आमचा प्रोटोकॉल.."

"म्हणजे?"

"तिकडे डायनिंग हॉलमध्ये पैसे खाऊन झाले की ही डायजेस्टिंग रूम. इथे पैसे पचवून झाले व्यवस्थित की सारे आपापल्या कामाला हजर. शिस्त म्हणजे शिस्त!"

"वा! शिस्तप्रिय अगदी!"

"अर्थात. मात्र पैसे खाऊन, पचवून काम केले नाहीत तर शिस्तभंगाची कारवाई होते. प्रामाणिकपणा हवाच. तशीच कारवाई पैसे न खाता काम केलं तरीदेखील होते.."

"शिस्त म्हणजे शिस्त! पण कुणाला अपचन झालं तर?"

"जनरली होत नाही अपचन. सारे वेल ट्रेन्ड आहेत. मोजून मापून खातात. उगाच हावरेपणा नाही. नीट चावून खातात. पचनाची काळजी घेतात."

"चांगलीच सिस्टीम बसलीय!"

"होय तर! वर पासून खालपर्यंत. कुठे गडबड गोंधळ नाही."

"आणि कुणी म्हणाला भूक नाही, खात नाही वगैरे तर?"

"असतात रे असे कुणी. खात नाहीत म्हणतात! असला भ्रष्टाचार नि असली बेशिस्त! सगळीकडे थोडंफार हे असतेच. अशांचा तोरा पहावा नुसता! त्यात वरच्या पोस्टवर कुणी असा निघाला तर पहायलाच नको."

"मग काय?"

"अरे, तो वरचा अधिकारी इनव्हेरियबली हुकुमशाही चालवतो. स्वत: तर खात नाही. हाताखालच्यांना उपाशी मारतो. जनरली असे हुकूमशहा जास्त टिकत नाहीत. म्हणजे आपली एकूण सिस्टीम इतकी वेल डेव्हलप्ड आहे ना.. अशांना टिकू देत नाही. कारण त्याच्या वर कुणी ना कुणी असतोच ना. तो व्यवस्थित काळजी घेतो. अशा इतरांची उपासमार करणाऱ्या हुकुमशहांना मग कुठल्यातरी जाळयात अडकवतात. नाहीतर दुसऱ्या खात्यात बदली. आता सरकारी ऑफिसात विविध विभागांना 'खाते' म्हणतात ते काय उगीच? इतके ही कळत नसेल तर सरकारी अधिकारी होण्याचा तुम्हाला अधिकारच नाही."

मी भारावलो होतो. शिस्तबद्ध नि व्यवस्थित डेव्हलपड् सिस्टिम. सरकारी कामाबद्दल विचार करून माझा ऊर भरून आला.

धनेशच्या ऑफिसात माझे काम छोटेसेच होते. एक धनादेश देण्यापुरते. त्यामुळे तशी देवाणघेवाणीची वेळ आली नाही. धनेश खाली स्वत: सोडायला आला. येता येता म्हणाला,"थोडा कामात आहे रे! नाहीतर गाडीनं सोडलं असतं तुला. मागच्या वर्षीच घेतली. हुंडाईची सेव्हन सीटर. पिकनिकला वगैरे जायला बरी पडते! तू जातोस की नाही कुठे?"

पिकनिक? माझ्या डोळ्यांपुढे महिनाभराची ओढाताण आली. शेवटचं वाक्य ऐकून न ऐकल्यासारखं करत मी पुढे झालो.

"भेटू परत.." म्हणालो नि रिक्शाला हात केला..

त्या तीन चाकीत मी बसलो तेव्हा धनेश आपल्या सेव्हन सीटरवर मायेने हात फिरवत होता.

# एकलव्य

तो दिवस खास होता माझ्याकरता. माझा मित्र, डॉ.बी.एस.तडवी खूप दिवसांनी भेटला. त्याच्या कॉलेजातच त्याने चालू केलेल्या 'स्टुडंट्स काऊन्सिलिंग सेंटर'च्या उद्घाटनाचं त्याने खास आमंत्रण पाठवलं नि सगळी कामं सोडून कॉलेजात इतक्या दूरवरून खास आलो. कारण ही खास होते नि माझा मित्र ही खासच होता. डॉ.बी.एस.तडवी. म्हणजे आमच्या एम. बी. बी. एस. च्या पहिल्या वर्षात पहिल्याच दिवशी भेटलेला हा बारक्या तडवी.

माझं गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज. ॲडमिशन झाली. डॉक्टर बनण्याची स्वप्नं पाहात कॉलेज सुरू व्हायची वाट पाहात दिवस चाललेले. मग हॉस्टेल रूम मिळाली.

माझ्या हॉस्टेलमध्ये रूम पार्टनर म्हणून पहिल्यांदा भेटलेला तो. वेगवेगळ्या आधुनिक नावांत अगदीच ऑड वाटणारे नाव त्याचे. सकाळी कॉलेजच्या मेन लेक्चर हॉलमध्ये उपस्थिती घेताना त्याचं नाव ऐकलेलं.. बारक्या सहान्या तडवी.

आमचे कुलकर्णी सर देखील ते नाव उच्चारताना अडखळले. बारक्या तडवी! काही वर्षांत तो डॉ.बारक्या तडवी म्हणून ह्या मेडिकल कॉलेजातून बाहेर पडणार. आजूबाजूला चांगल्या कपड्यातली मुलं. चकचकीत. त्यात मी देखील आलोच. मी तोंडात सोन्या चांदीचा चमचा घेऊन जन्मलो नसलो तरी खाऊन पिऊन सुखी असणाऱ्या आमच्या भागवत कुटुंबातला मी. समाजातली उच्चनीच नि जातीपातींतले भेदभाव ऐकून माहिती. पण माझ्या प्रत्यक्ष पाहण्यात ते आजवर आले नव्हते. नाही म्हणायला मेडिकलच्या ॲडमिशनच्या वेळी या एससी एसटी कोट्याबद्दल वाटायचं.. किती सहज ॲडमिशन मिळेल या लोकांना. नाहीतर मी! डॉक्टरकीचं स्वप्न पुरं करायला दिवसरात्र एक करत होतो. त्यानंतर ही तो प्रवेश मिळेलच याची खात्री नव्हती.

आज येथे पोहोचलो तर रूम पार्टनर मिळाला तोच हा बारक्या. बारक्या नावानंच नाही तर अंगानंही बारक्या. काळसर, तोंडावर बेफिकिरीचे भाव, अस्ताव्यस्त केस नि चुरगळलेले कपडे. एवढ्यावर भागत नाही म्हणून तोंडात अशुद्ध भाषा. इंग्रजीचा गंध थोडाफारच. मराठीही धड नाही. रिझर्व्हेशनच्या जोरावर इथवर पोहोचलेला. बघताक्षणी वाटावं, हा आलाय खरा, पण एक मेडिकलची सीट वाया घालवणार नक्की हा. कुणाकुणाचं त्याच्याबद्दल मत,'कहां कहां से चले आते हैं' असेल तर आश्चर्य नको वाटायला. शहरी

वातावरणाचा गंध नसलेला बारक्या. एकूण वातावरणात बुजलेला. पण तरीही तग धरून उभा.

मी माझ्या खोलीवर आलो. माझी सामानाची नवीन कोरी सूटकेस सकाळी आणून टाकलेली. ती उघडून बसलो तोच बारक्या आत शिरला. त्याची पत्र्याची पेटी घेऊन. त्या चिपलेल्या काळ्या पेटीत नि त्याच्यात मला काहीतरी साम्य वाटलं.

खरं सांगतो, त्याला पहिल्यांदा पाहिलं नि आजवरचे मध्यमवर्गीय संस्कार उफाळून आले. अगदी शाळेत असताना सांगितले जायचे, हुशार मुलांची संगत धर. कुणी वाया गेलेला पोरगा असेल तर आई म्हणायची त्याच्यापासून दूर रहा. बारक्या त्यातला तर नसेल? वाया गेलेला? किंवा अशा मुलाला चोरी करण्याची तर सवय नसेल?

"नमस्ते भाऊ. म्या बारक्या.."

"नमस्ते. मी मिलिंद भागवत."

"ठौकेय. पहिला नंबर हाय लिस्ट मध्ये.. हुशार लय. बरंय. मला बी शिकवा जरा.."

"अरे, मी काय शिकवणार? मी पण शिकायलाच तर आलोय."

"ते खरं. पन माझ्याहून जात्याच हुशार तुम्ही.. म्या हा असा. पन शिकायचंयच मला."

बारक्याच्या दोन वाक्यांतच तो बऱ्यापैकी हुशार वाटला मला. म्हणजे मला तो हुशार म्हणाला म्हणून नाही, तर स्वत:बद्दलचे त्याला बरोबर आकलन होते. आजवर मी एका सुखवस्तू कुटुंबात वाढलेलो. घर खाऊनपिऊन सुखी. माझ्या आईने श्यामची आई पासून साने गुरूजींची सारी पुस्तके माझ्याकडून वाचून घेऊन संस्कार केलेले. उच्च न कोणी, नीच न कोणी.. आणि प्रत्यक्षात इथे बारक्यात नि माझ्यात साम्य म्हणावे ते एकच. आम्ही दोघे एकाच मेडिकल कॉलेजात एकाच वर्गात पोहोचलेलो. एवढंच. मी तथाकथित उच्च म्हणाव्या अशा जातीतून. मेहनत करून मिळवलेली जागा. आणि त्याला आरक्षणातून ती मिळालेली.

त्या रात्री मला खूप सारे प्रश्न पडले. साने गुरूजींच्या पुस्तकांची माझ्यावरील संस्कारांची परीक्षाच पाहिली गेली म्हणा ना. या अवतारातल्या बारक्याबरोबर राहाणे म्हणजे एक संकट वाटले मला. उद्याच रूम पार्टनर बदलावा असा विचार करून मी झोपायला गेलो खरा. पण मनातल्या प्रश्नांचा भडिमार व्हायला लागला. असा ओबडधोबड बारक्या इथवर तरी कसा पोहोचला असेल? त्याला डॉक्टर बनायची इच्छा का नि कशी झाली असेल? मराठीही नीट न येणारा तो इंग्रजी कशी निभावून नेईल? झेपला नाही अभ्यास तर किती वर्षे एकाच वर्गात काढेल? त्याला खरंच अभ्यासाची इच्छा आहे की मिळतोय प्रवेश म्हणून पोहोचलाय इकडे? मध्यरात्रीपर्यंत मनात विचारच विचार येत होते. बाजूला बारक्या गाढ झोपला होता. सकाळचेच कपडे घालून. त्याच्या पेटीत अजून एकच जोड कपड्यांचा होता हे पाहिलं होतं मी. हा असा आणि मी? याच्याबरोबर मी का रहावे? माझी नि याची दुरून ही बरोबरी होऊ शकेल का? त्याची योग्यता आहे का ही? पण एकाच ईश्वराची लेकरे म्हणवले जाणाऱ्या

माझ्यात नि त्याच्यात काय फरक आहे? मी आणि तो? खरंच दोघांमध्ये काय फरक आहे? आहे हे खरंच, पण तो फरक का आहे? निव्वळ जन्मामुळे?

या शेवटच्या प्रश्नाने माझी झोप उडाली. मी स्वत:ला श्रेष्ठ नाही तरी मोठा मानतोय का? का असा विचार मनात यावा? असं असेल तर त्या लहानपणीच्या संस्कारांचा उपयोग तो काय?

कसा ही असला तरी बारक्या शिकायला आलाय इकडे. म्हणजे शिकण्याची इच्छा असणारच. उगाच मिळतोय प्रवेश म्हणून आलेला नाही तो. पण त्याची लाख शिकण्याची इच्छा असो, आजूबाजूचं वातावरण त्याला शिकू देईल की नाही हा खरा प्रश्न. माझे विचार असे हेलकावे खात होते. पण एकदा बारक्या पेक्षा आजूबाजूच्या वातावरणावर माझं लक्ष केंद्रित झालं. खरा प्रश्न बारक्याचा नाही, तर बाकीच्यांचा. त्यांना याला आपल्यात घ्यायची इच्छा आहे का नि असेल तर किती आहे? हे लक्षात आलं नि मला सारं लख्ख दिसायला लागलं.

कॉलेज सुरू झालं. रोज सकाळची लेक्चर्स. छान कपड्यातले पोरं पोरी. बारक्यासारखे अजागळ एखाद दुसरेच कोणी. त्या रात्रीच्या विचार मंथनानंतर एक झालं, सकाळी बारक्याला म्हटलं,

"बारक्या, हे सगळं तुझ्या ओळखीचं वाटत नसेल तुला?"

"व्हय ना. तुम्ही जरा मदत कराल ना?"

"मी कसली करणार मदत? मीच घर सोडून आलोय.."

"पण तुम्ही मोठे.."

"अरे, तुम्ही काय? मी काय खरंच मोठा आहे का तुझ्याहून?"

"असं कसं. बघणारा म्हनंल ना, मी छोटा तुमच्याहून.."

"वेडा की काय? अरे, आजपासून मी तुझा दोस्त. इकडे काहीपण लागलं तर मला सांग.."

"चालतंय की. पन तुमचे बाकीचे दोस्त.. म्या हा असा.."

"ते आहेतच. पण तुला इथली सवय होईतोवर माझ्याबरोबरच रहा.."

त्या रात्रीच्या विचारांनंतर मी हे ठरवलेले, बारक्या तसा हुशार दिसतोय. इकडच्या वातावरणात हरवला तर एक आयुष्य वाया जाईल. ते ही फक्त या वातावरणात न जुळल्याने. त्यामुळे आता आमची दोघांची एक जोडी झाली. मी त्याला कॉलेजात घेऊन फिरू लागलो. आमच्या जोडीला कुणी विजोड म्हणेल याची चिंता न करता. मी गोरागोमटा. नि तो काळसर. मी तसा उंचपुरा नि तो हडकुळा बारीकसा.

तो बरोबर नसल्याचे पाहून बाकीचे मित्र म्हणायचे,'असा कसा रे हा?' किंवा 'कसा ही असेल तो, तू कशाला भाव देतोयस त्याला?'

एक दोघं तर त्याच्या जातीवर घसरले. आणि रिझर्वेशन वर ही. मी ठरवून टाकलेलं, काही होवो, कोणालाच कसलं स्पष्टीकरण देत बसायचं नाही.

बारक्या थोडा थोडा रूळायला लागला. माझ्याबरोबर असला की बोलत असे. बाकींच्या समोर बुजून गप्प राहात असे. वर्गात शिक्षकांसमोर तर तोंड उघडणं दुरापास्त. तसा शिस्तीचा होता तो. अभ्यास म्हणून पुस्तक घेऊन बसे. इंग्रजी बोलण्याची बोंब असली तरी त्याचं आकलन चांगलं होतं. विशेषत: ॲनाटॉमीत त्याला गती होती. समोरच्या डायग्रॅम्स पाहून त्याला ते शरीरशास्त्र

चटकन समजे. पण कोणाला ते शब्दात सांगताना पंचाईत. भाषेची अडचण. फिजिऑलॉजीत त्यामुळे चांगलाच गोंधळ होई.

एक दोन महिने गेले. तो चाचपडत होता. बाकी आम्हा सर्वांची गाडी जोरात होती. मध्ये एक्झाम झाल्या त्यात त्याने अर्थातच दिवे लावले कारण सर्व फक्त ओरल्स होत्या नि याची बोलण्याची बोंब होती. एका ओरल नंतर तो सर्व प्रश्न मला सांगत होता नि त्याची उत्तरं देखील. म्हटलं, म्हणजे ही एक्झाम एकदम तोडफोड? तर म्हणाला, "नाही भाऊ. पण मला येतं बऱ्यापैकी पण लिहायची नि बोलायची सोय नाही. कुणी हसेल म्हणावं तर तसे ही हसतातच. पण इंग्रजीत वाक्य जुळवेपर्यंत विषयच मागे पडतो.."

मग एक दिवस तोच म्हणाला,"मिलिंदा, यार तू इंग्रजीत बोल की माझ्यासंग. म्याबी बोलंन.."

ही कल्पना त्याचीच. मग आम्ही न चुकता इंग्रजीत बोलायला लागलो. बारक्या हुशार होता. आपल्याकडे हुशारी फक्त मार्कांनी मोजली जाते. त्या मोजमापाने नाही. पण त्याची स्मरणशक्ती उत्तम होती. नियमित अभ्यासाची सवय होती. इच्छा तर होतीच. समज चांगली होती. त्याला परीक्षेत मिळणारे कमी मार्क फक्त भाषेच्या गडबडीने होत असावेत. काही महिन्यातच त्याने इंग्रजीत प्रगती केली. इतकी की एका ओरल परीक्षेत आमच्या एका सरांनी त्याचे चक्क भर वर्गात कौतुक केले. सगळ्यांच्या नजरा बारक्याकडे वळल्या. बारक्या अजून बुजला जरा. पण मनातून खुश झाला. इतकी वर्ष तो झगडत होता, त्या झगड्याला थोडं का होईना, यश येताना दिसत होतं. पुढे अजून एक दोन परीक्षांतही त्याला अगदी पासिंग मार्क मिळाले नि गडी हरखला..

मी विचार करायचो. मला डॉक्टर बनायची हौस लहानपणापासून. कितीही कठीण असो, अभ्यास करायचाच. नि या नंबर वन कॉलेजात ॲडमिशन मिळवायचीच. थोडी अढी या रिझर्व्हेशनवाल्यांच्या बद्दल असायची. पण ती तितपतच. कित्येक जण त्यांना अगदी शिव्या द्यायचे ते मी कधी केले नाही. मुळात त्यांना इथवर येण्यासाठी काय काय अडथळे येतात हे माहिती करून घेतल्याशिवाय मत बनवणे अयोग्य वाटायचे. वाटायचे, ह्या बारक्याची शिक्षणाची प्रेरणा काय असावी? मुळात त्याला शिकावंसं वाटावं असं काय असेल त्याच्या डोक्यात? एक होतं, बारक्या गंभीरतेने प्रयत्न करत होता. आधी दोन नि चार मार्क मिळवणारा तो आता पासिंग मार्क कसेबसे का होईना मिळवत होता. कित्येक परीक्षांतील प्रश्नांची उत्तरे तो भले न लिहो, त्याला ती येतही होती. प्रथम वर्षातले विषय त्याला जमत होते. आम्ही रूम मध्ये इंग्रजी बोलत होतो. माझ्याबरोबर त्याचं मराठी ही सुधरत होतं. हळूहळू त्याला आत्मविश्वास येत होता.

एका अशाच संध्याकाळी तो त्याची गोष्ट सांगायला बसला.

तो नंदुरबारकडल्या कुठल्या तरी छोट्याशा खेड्यातून आलेला. भिल्ल. घरचं दारिद्र्य. शिक्षणाचा गंध कोणाला नाही. शिकावं अशी इच्छा ही नाही. आलेले दिवस बदलण्याची इच्छा नाही. तसा दृष्टीकोन नाही. मुळात शिक्षणाने नुसतीच नोकरी मिळत नाही, आकलन सुधारते, दृष्टी मिळते. या सर्वांपासून मैलोनमैल दूर असे घर त्याचं. त्याला शिकायचं तर त्यासाठीही टोकाचा विरोध. शाळा म्हणावी तर एक शिक्षकी. त्या शिक्षकाला शिकवणं सोडून सारी कामं सरकारने दिलेली. त्याचं जणू कॉम्पनसेशन म्हणून आठवीपर्यंत पोरांना नापासच न करण्याचे धोरण. पोरं शिकणार काय नि पुढे जाणार काय? मग चांगल्या

शिक्षणाला जणू पर्याय म्हणून आरक्षण. कमी शिका, कमी ज्ञान मिळवा.. असलं शैक्षणिक अपंगत्व पोरांच्या नशिबी. अशा पार्श्वभूमी मधून थेट शहरात पोहोचलेला हा बारक्या. शहरी वातावरण नि शहरातली मुलं.. सारंच परकं. त्यात भाषेची अडचण. इंग्रजी सोडा, मराठीला ही हसणारे सारे जण.

"शिकायची लय इच्छा मला. घरचं दारिद्र्य संपवायचं तर दुसरा इलाज नाही. पण मला शिकायचं त्याला अजून एक कारण आहे.. आमच्या गावात एक ही जण शिकलेला नाही. म्हणायला सारे आठवी पास. नववीत शाळा ढकलते वर. मग दहावीत पास होणारा मीच पहिला. तो ही का? आमच्या गावात शिंदे मास्तर आलेले. मी नि बाकी दोन चार पोरांला संध्याकाळी घरी बोलावून शिकवायचे. बाकी कोणाला शिकायचंच नसेल तर ते तरी काय करणार? मला पण लोक म्हणायचे, शिकून काय तू साह्येब व्हनार की बालिस्टर? मग रागानं मी म्हणालो, होईन मी डॉक्टर! मी जर झालो ना डॉक्टर तर गावातल्या पोरांच्या डोळ्यांपुढे एक उदाहरण उभं राहिल. मग त्यातला कोणी शिकायला तयार होईल.. नाहीतर लोकं परत तेच म्हणत राहतील.. आपल्याला नाही जमणार शिक्षणबिक्षण. मी पास होणं माझ्यासाठीच नाही गावासाठी ही जरूरीचं आहे.."

बारक्याचा आवाज सच्चा होता. शिक्षणामागची तळमळीची भावना सच्ची होती. बिचारा शिकू इच्छित होता पण तशी सोय कुणी करून दिली नव्हती. जिल्हापरिषदेच्या शाळा उघडून नि आरक्षणातून प्रवेश देऊन सरकारनं आपले हात झटकलेले. शिक्षणाचा दर्जा काय हे त्याच्या गावीच नसेल तर उच्च शिक्षणात हे आरक्षणातून आलेले हरवून जाणार नाहीत तर काय?

बारक्याचा संघर्ष सुरू होता. अभ्यासाशी. आणि स्वत:शी ही. आपला न्यूनगंड झटकण्याचा संघर्ष. मग भाषेशी झटापट. पण हळूहळू तो पुढे जात होता.

पहिल्या वर्षी ॲनाटॉमीत पठ्ठ्याने चांगलेच मार्क्स मिळवले. बाकी विषयांत काठावर का होईना पास झालाच. कॉलेजच्च्या स्पोर्टस् मध्ये धावण्याच्या शर्यतीत पहिला आला तो. तो ही बिना चप्पल बुट अनवाणी धावून. गावचं पाणी ते. जगण्यामागे धावता धावता ही दोन चारशे मीटर धावण्याची शर्यत तो न जिंकता तरच नवल. थोडा थोडा आत्मविश्वास तो कमावत होता.

मेडिकल कॉलेजचं पहिलं वर्ष तेव्हा दीड वर्षाचं असायचं. त्यात बरीच मजल मारलेली गड्यानं. इंग्रजीतली साधी वाक्य अचूक बोलायचा. मराठी तर सुधारलेली. जात्याच हुशार होता तो. त्यात शिकण्याची दुर्दम्य इच्छा. बाकी पोरं चिडवायची पण हळू हळू त्याला सामावून घ्यायला लागलेली. शहरी वातावरणात बाकी काही असो, कुणी जातपात पाहात बसत नाहीत. त्यामुळे तसा त्रास कुणी दिला नाही त्याला. स्पोर्ट्स मध्येही तो पुढे आल्याने तर कित्येकांनी त्याला ॲक्सेप्टही करून टाकलेलं. कदाचित इतरांनाही त्याच्या सिन्सियारिटीची जाणीव झाली असावी.

दिवस जात होते. कॉलेजच्या लेक्चर्स बरोबर आता हॉस्पिटलात जावं लागत होतं. मिळणारा वेळ आता कमी होता. पण मेहनत मात्र करत होता तो. होता होता मी आणि तो दोघेही पहिल्याच प्रयत्नात एमबीबीएस झालो. मी युनिव्हर्सिटीत पहिला होतो. पण मला मात्र बारक्याचं जास्त कौतुक होतं. बारक्या तडवी शेवटी डॉक्टर बी.एस.तडवी झालाच. त्याच्या भिल्लांच्या पाड्यात इतिहास रचला गेला. त्याचं नाव उत्तीर्णांच्या यादीत पाहून खरं सांगतो डोळे भरून आले. पुढे मी सर्जन झालो. कॉलेजातून बाहेर पडल्यावर आपल्या

गावी रवाना झालो. तो आमच्याच कॉलेजात राहिला. हळूहळू हेड ऑफ द मेडिसीन डिपार्टमेंट बनला.

आजचा समारंभ संपला. कॉलेजात मुलं येतात. सतरा अठरा वर्षांचं वय. दुनिया पाहिलेली नाही. डोळ्यांत स्वप्नं आहेत. पण त्यात नाना अडथळे आहेत. त्यांना मार्गदर्शन म्हणून तडवी डॉक्टरांनी चालू केलेलं हे मार्गदर्शन केंद्र. मी भाषणं ऐकली. त्या सगळ्याची पार्श्वभूमी ठाऊक असल्याने मला बारक्याचं जरा जास्तच कौतुक वाटलं.

"आहेस ना एक दोन दिवस?"
बारक्या मला विचारत होता.
"अरे, नाही रे. जावं लागेल. प्रॅक्टिस सोडून आलोय.."
"दुपारी तरी थांब. कित्येक वर्षांत बोलणं झालं नाहीये. जरा थांब.."

मी हॉस्पिटलात फोन केला. आजची ओपीडी कॅन्सल करून थांबलो. माझा मित्र आज एच.ओ.डी. च्या खुर्चीत बसलेला. एकेकाळी स्वत:चं नाव सांगताना ततपप करणारा आज व्यासपीठावरून अस्खलित इंग्रजीत भाषण देत होता नि लोक टाळ्या वाजवत होते! स्वत: कित्येक अडचणींवर मात करून पुढे आलेला, आता विद्यार्थ्यांना मार्गदर्शक बनून मदत करू पाहात होता.

आम्ही त्याच्या केबिनमध्ये बसलेलो. पहिलेच वाक्य त्याचे,
"थ्यँक्स मिलिंद."

"कशाबद्दल?"

"सगळ्याबद्दल यार! तू आलास, थांबलास.."

"अरे, इतका स्पेशल इव्हेंट .."

"नो यार! खरंतर थ्यॅंक्स त्याबद्दल नाही.. ते तर कुणीही येईल. कारण आता मी नुसता बारक्या नाही. तर डॉक्टर बारक्या तडवी आहे. हेड ऑफ द डिपार्टमेंट आहे. पण तेव्हाची गोष्ट वेगळी होती."

"पण पडलं ना सारं पार?"

"त्यासाठीच थँक्स. त्या दिवसांत तू सांभाळलं नसतंस तर? पहिला दिवस लख्ख आठवतो अजून. पहिल्याच दिवशी मला वाटलेलं की पळून जावं. सगळी चकचकीत पोरं नि पोरी. हाय फाय सारी. मी फाटक्या कपड्यातला. नि होस्टेलला काय? तू असा नि मी तसा. रूम पार्टनर म्हणून तू तरी माझ्याबरोबर का रहावं? अरे, आमच्यातले काही तर सरकार दरबारी ऑफिशियली चोर समजले जातात. पंचक्रोशीत कुठे गुन्हा घडला की कुणावर तरी संशय घ्यायचा नि कोणी सापडलं नाही तर आमच्यातल्या कुणाला ही पकडून नेतात, अजूनही. अशात तुझ्यासारख्याने माझ्याबरोबर का रहावे? नुसता राहिला नाहीस.. पण सांभाळलं मला. तू होतास म्हणून बाकी पोरं जास्त त्रास द्यायची नाहीत. अर्थात नंतर नंतर तर बाकीचेही मित्र झाले माझे. पण ते खूप नंतर. मी थोडा बरा बोलायला लागलो, बरे कपडे घालायला लागलो नि परीक्षेत पास व्हायला लागलो त्यानंतर. तोवर फक्त तुझा आधार होता.."

"बस रे. उगाच हे आभार प्रदर्शन.."

"नो.. तुला हे सांगायचंच आहे आज.. खरं सांगतो, माझ्यासारखे विद्यार्थी कोणत्या बॅकग्राउंडमधून येतात त्याची कल्पनाही कुणाला करता येणार नाही.

इकडे काय किंवा अगदी आय आय टी किंवा इंजिनियरिंग मध्ये काय.. आम्ही कॉलेजात शिरलो की अंगावर काटा येतो. भाषेची अडचण, आमच्या शिक्षणाच्या दर्जाची अडचण. नि आमची तुलना होणार ती टॉपर्सशी. त्याबद्दल म्हणणं नाही काही. पण आम्हांला हवं असतं ते हँड होल्डिंग. कुणीतरी मार्ग दाखवणारा. कुणाचा तरी विश्वास हवा आमच्या कॅपॅबिलिटीवर, अगदी ॲकॅडॅमिक कॅपॅबिलिटीवर ही असायला हवा. नुसतीच सीट अडवणारे आम्ही, रिझर्व्हेशन आहे म्हणून पोहोचतो येथवर असले सगळयांचे विचार. थोडेफार बरोबरही आहेत ते. पण आमच्यापैकी कित्येकांना शिकायचे असते मनापासून. पण आजूबाजूची व्यवस्था तसा सपोर्ट देईलच असं नाही. सोळा सतरा वर्षांची पोरं मग कितपत तग धरू शकतील? आधीच नसलेला आत्मविश्वास कुठवर गोळा करून ठेवतील? मी शिकलो. गावात एक उदाहरण सेट झालं. आता गावात दहावी होणारी पोरं वाढली. एक दोघं इंजिनियर, एक वकील झाला. शिकणारा मी पहिला.  पहिल्या पिढीचा आदर्श समोर असणं महत्वाचं. एकदा स्वत:च्याच क्षमतेवर विश्वास असला तर आपला मार्ग कोण अडवणार आहे? तुला सांगतो, तुझ्यासारखा आधार मिळाला.. तसा कुणाचा आधार मिळायला हवा. घरातून तो मिळणं अशक्य आमच्यासाठी. आधीची एक दोन वर्षं गेली त्यानंतर मात्र मला बाकी सगळयांनीच सांभाळून घेतले. पुढे पुढे तर आधाराची गरजच नाहीशी झाली."

"ती तुझीच कॅपॅबिलिटी.."

"असेल. पण ती डेव्हलप होईतोवर? रोप उगवण्याआधीच कुणी बी उखडून टाकलं तर? झाड उगवणार कसं नि मग त्याचा वृक्ष होणं तर दूरची गोष्ट. पण त्याहून महत्वाचं काही. अरे, आमच्यासारखी पोरं म्हणजे एकलव्य. शिकायचंय पण शिकवणारा कोणी नाही. मग शिकायचा प्रयत्न करायचा. कधी सफल तर

कधी विफल. आजूबाजूचं काही समजेनासं झालं तर एकतर स्वत:च्या कोशात गुरफटून जायचं. नाहीतर उनाडक्या नि टवाळक्या करत माज आल्यासारखे दाखवत राहायचे. मवाली म्हणून ओळख झाली तयार की त्या इमेजला जागत रहायचे. त्या एकलव्याचा अंगठा द्रोणाचार्यांनी कापून घेतला. त्यांना तेव्हा अर्जुनानेच थांबवलं असतं तर? तू माझ्यासाठी अर्जुन बनून आलास. जी व्यवस्था आम्हाला वर येऊ देत नाही, तिच्यातूनच कोणी हात दिला तरच वर येणार आम्ही. व्यवस्थेच्या विहिरीत गटांगळ्या खात बुडणाऱ्याला वाचवायला जमिनीवरच्या स्थिरस्थावर असलेल्या कोणीतरीच दोर टाकायला हवा. अर्जुन्स शुड हेल्प एकलव्याज.. जशी तू मला केलीस मदत तशी.."

"तुझं म्हणणं खरंय.."

"म्हणून तर हा घाट. कुठलीही अडचण असली तरी मदतीचा हात द्यायला कुणीतरी हवे. नुसते प्रॉब्लेम्स ऐकून घेतले ना तरी पोरांना हलकं वाटतं. अर्थात हे केंद्र फक्त अशाच मागास विद्यार्थ्यांसाठी मर्यादित नाही. सर्व विद्यार्थीच आहेत, तरूण वय आहे. जग पाहिलेलं नाही अजून. तर समस्या असणारच. कुठल्याही स्तरातले असोत. आम्ही फक्त त्यांना गोष्टी सांगणार युक्तीच्या चार. लढाई त्यांची त्यांनीच लढायची आहे. एकलव्यांना मार्गदर्शन करायला आम्ही कृष्णासारखे. अर्थात अगदी मागासवर्गीयांना सामावून घ्यायला तुझ्यासारखे वेगवेगळे अर्जुन देखील पुढे यायला हवेत. सामाजिक समता येणं तर शक्य नाही. किमान समरसता तरी यायला हवी.."

बारक्या बोलत होता. लहानपणापासून वेगवेगळ्या अनुभवांतून गेलेला तो. आणि त्याच्या त्या विश्वाची कल्पना देखील करता येणार नाही असे आयुष्य असलेला मी. तो मला अर्जुन मानत होता. मी अर्जुनासारखा राजपुत्र होतो,

साऱ्या सुखसोयी माझ्या पायाशी होत्या असे ही नाही. पण त्याच्या नजरेतील समाज व्यवस्थेत माझी स्थिती अर्जुनाहून कमी कशी म्हणावी? विशेषत: तो एकलव्य असताना?

माझा मित्र आता मोठा झालाय. एकलव्य म्हणवणारा तो अगदी कृष्णाच्या भूमिकेत शिरू पाहतोय. त्यात त्याचेच कर्तृत्व खरे. पण तरीही त्याच्या ह्या विकासात माझा एक खारीचा वाटा होता.. याचाच मला आनंद आहे.

# सुकडोजी महाराज!

एकेकाची शरीरप्रकृती असते. कुणी ठीकठाक असतं तर कुणी सदैव अगदी चुस्त. कुणी उंच कुणी बुटका. हे देखील स्थळ सापेक्ष. इकडचा कुणी धिप्पाड आफ्रिकेत अगदीच किलचण समजला जाईल. इकडचा उंच काही देशात साधारण उंचीचा गणला जाईल. तेव्हा जाडं बारीकपण वगैरे तशा सापेक्ष कल्पना असायला हव्यात. गोरेपण नि काळेपणासाठी ही हेच खरे मानावे की नाही? आपला सावळा जातिवंत निग्रोंपुढे गोरा गणला जावा की नाही? आणि आपले गोरे पाश्चात्य पांढऱ्यांसमोर फिके पडावेत!

मुद्दा हा, की यांना किती महत्व द्यावे? जन्म, जात, धर्म इत्यादी आपल्या हातात नसलेल्या कुठल्याही बाबीसाठी अभिमान किती उफाळून यावा नि एखाद्याला गर्वाची किती बाधा व्हावी त्यासाठी?

तर ही गोष्ट आहे सुकडोजी नामक एकाची.

सुकडोजीला हे सुकडोजी नाव मी ठेवले ती गोष्ट अलिकडची. त्या आधी तो लुकड्या, सुकड्या, हड्डी, काडीपैलवान किंवा सिंगल फसली वगैरे नावांनी ओळखला जायचा. शाळेत असल्यापासून तो असाच. बारीक, किडकिडीत. त्यात उंची चांगली त्यामुळे अंगकाठी काठीसमान त्याची. लोकं चिडवायचे, अंग हीच काठी असा अंगकाठी शब्दाचा विग्रह करायचे. शाळेत बाकी धष्टपुष्ट पोरं त्याला काही ना काही कारण काढून डिवचायची. कॉलेजात पोहोचेपर्यंत ताडमाड उंचीचा तो, कमी वजनामुळे अगदीच गंमतीदार  दिसायचा. कपडे अंगावर लपेटलेले, खरेतर गुंडाळलेले. चालायला लागला की जिराफासारखा उंच तो, वारा आला की त्या जोराने डुलतो की काय असा वाटायचा.

शाळा कॉलेजात असे नेहमीच्या नॉर्म मध्ये फिट न होणारे बकरे लागतात. कुणी जाड्या असतो, कुणी बुटका, कुणी काळा असतो तर कुणी चष्मा लावलेला ढापण्या. इतर पोरं अशांना चिडवायला टपलेली असतात. नि त्यांच्यातीलच त्याच वयाची  असणारी ही 'विचित्र' मुलं हे सारे सहन करत असतात. कुणी ह्याला पुढील आयुष्याची तयारी म्हणेल. कुणी म्हणेल दुर्लक्ष करा नि पुढे चला. पण त्या त्या वयात हे इतकं सहज सोपं असू शकतं?

सुकडोजीचं असंच झालं. आम्ही शाळेपासून बरोबरीचे. सुकड्याला सारेच सुकड्या म्हणत. त्याचे खरे नाव व्यंकटेश.. शाळेत हजेरी घेतानाच फक्त ऐकू येई. बाकी बहुतांशी सारे त्याला सुकड्याच म्हणत. मी देखील. सुकड्याला त्याची सवय झाली असावी. तरीही शारिरिक गुणावगुणांवरून कोणाला

हिणवावे हे बरोबर नाही हे कोणाला न समजत असे ना उमगत असे. असा सुकड्या

आज सर्वांसमोर बोलायला उभा राहिला. निमित्त आमच्या शाळेचे स्नेहसंमेलन. आमची पन्नाशी गाठली गेली त्यानिमित्ताने झालेले. आजही संमेलनात कुणी चुकून त्याला व्यंकटेश म्हणून हाक मारली तर हा म्हणाला, "सुकड्या म्हण की! आहे ते म्हणायला काय हरकत आहे?"

शाळा कॉलेजात मात्र हे असं नव्हते. व्यंकटेश आपल्या शरीरयष्टीबद्दल बऱ्यापैकी चिंतित असायचा. काय करू की थोडे वजन वाढेल याची सदैव चिंता. तसा अभ्यासात हुशार. म्हणजे अगदी तल्लख बुद्धी नि शिस्तशीरपणा. यामुळे कधी त्यात मागे नाही पण अंगकाठीच्या न्यूनगंडामुळे बाकी सगळीकडे मागे. खेळात कधी भाग घेणं नाही की शाळेतल्या समारंभांत स्टेजवर उभं राहणं नाही. कॉलेजच्या वातावरणात अजून आखडल्यासारखा झालेला. शेवटी काय आपली किंमत आपल्यालाच करावी लागते. आपल्याच नजरेत स्वत:ला कमी लेखायला लागलो की इतरांनी का किंमत करावी तुमची? हे त्यानेच सांगितलेलं तत्वज्ञान!

त्यादिवशी त्याने भाषण केले गेटटुगेदर मध्ये. अगदी मनापासून मनातले बोलला. आणि त्यातला मुख्य मुद्दा याच सुकडेपणाचा होता! लहानपणापासून पिच्छा पुरवलेला हा अवगुण म्हणा की गुण, त्याच्या मनात ठाण मांडून बसला असावा.. गेट टुगेदरात इतरही जण बोलले पण सुकड्याचं बोलणं मनात घर करून राहिलं. मनापासून बोलताना कदाचित शब्दांचा खरेपणा ऐकणाऱ्याच्या काळजाला भिडत असावा. तिथे शब्दांच्या रचनेला वा उच्चारांना फारसं महत्व

नसावं. कारण सुकड्या कधीच शाळेत वक्ता म्हणून ओळखला जात नसे. उलट कधी स्टेजवरून बोलायची वेळ आली तर त्याची भंबेरी उडायची.

संमेलनात मात्र तो चांगलाच खुलून बोलला..

"मित्र हो, मी तुमचा शाळूसोबती.. कोणी शामळू सोबतीही म्हणतील ज्यांना त्यावेळचा मी आठवत असेल.. मी व्यंकटेश अर्थात सुकड्या. खूप वर्षांनी आपण सारे भेटतो आहोत. साधारण पस्तीस चाळीस एक वर्ष. पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलंय. शाळेत असतानाचे दोस्तगण विखुरले. कोण कुठे, कोण कुठे गेले. काहींचा संपर्क आहे. कित्येकांचा नाही. बहुतेक सगळे आपापल्या जागी मजेत आहेत. असावेत.

तर, मी सुकड्या. शाळेत असताना सुकड्या ह्या एका शब्दाने पाठपुरावा केला माझा. तेव्हापासून मी हा असाच. सुकड्या. लोकं चिडवायची. काय काय विशेषणं वापरायची. तेव्हा वजन वाढण्यासाठी मी काय काय नाही केले? अभ्यासात गती होती म्हणून कुणी स्तुती केली की वाटायचे अंगावर मूठभर तरी मांस चढावे.. पण कसलं काय! मी तसाच राहिलो, पाप्याचं पितर!

सगळं ऐकून वाटायचं, मला ऐकू येत नसतं तर बरं झालं असतं. कुणी बहिरा म्हटलेलं थोडीच ऐकू येतं बहिऱ्यांना? तर या सुकडेपणाबद्दल कमालीच्या न्यूनगंडात शाळाच नाही तर कॉलेजचेही दिवस गेले. शाळेत नाही, तर कॉलेजात पोरं पोरींवर इंप्रेशन मारायचे. मी हा असा. कोणावर इंप्रेशन मारायचं तर काहीतरी पर्सनॅलिटी तर हवी. ती नाही हेही ठाऊकच होते. पण आत्मविश्वास? तो खरा. खरं सांगू, तर कॉलेजात असतानाच हे जाणवायला लागलं. नि ते ही माझ्या तेव्हाच्या मैत्रिणीमुळे. मैत्रिणीचं नाव घेतलं म्हणून आश्चर्य वाटून घेऊ नका. मी तेव्हा व्यंगचित्रं काढायचो. त्यावर फिदा झालेली

माझी एकमेव मैत्रीण होती.. ती कोण? तीच जी पुढे माझी जीवनसाथी झाली. एका कॉलेज सहलीत तिने मला चांगलीच तडी दिली. एकतर मी त्या सहलीला जायला तयार नव्हतो, ओढून घेऊन गेली. मग त्या सहलीतच प्रसंग पाहून म्हणाली, जोवर तू स्वत:ला आहेस तसा स्वीकारत नाहीस तोवर इतरांनी तसा स्वीकार करावा अशी अपेक्षा कशी करू शकतोस? एका उंच मानेच्या नि बारीक पायाच्या जिराफाने हत्तीशी तुलना का करावी? दोन माणसं एकासारखी एक नसतात. पण सामान्यत: जसे सगळे असतात तसेच इतरही असावेत हा दुराग्रह कशाला? इतरांचे एक ठीक आहे, पण स्वत:च स्वत:ला कमी लेखावे? तिच्या कानउघाडणीनंतर हळूहळू मी बदललो. माझा न्यूनगंड कमी झाला. एका रात्रीत नव्हे, कारण वीस पंचवीस वर्षांपासून मनात घर केलेला विषय असा अचानक निघून कसा जाईल. माझ्या मैत्रिणीने, अजून ही ती मैत्रीणच आहे, लग्नानंतरही.. मला चांगलीच नजर दिली. नवी दृष्टी दिली. अभ्यासात मी हुशार होतो हे तुम्हालाही ठाऊक आहे. माझ्याकडे व्यंगचित्रकला होती हे नसेल कुणास माहिती. मी व्यंगचित्र काढायचो. पुढे कुठे कुठे ती प्रकाशित ही व्हायला लागली नि माझा आत्मविश्वास बळावला. आय ॲम वर्थ समथिंग वाटायला लागले. तोवर माझ्या या किडकिडीतपणाचं मला काही वाटेनासं झालेलं. घरी माझे वडील माझ्यासारखेच, माझी बहीण तशीच. तिचं नाव इंद्रायणी, तर तिला इंद्रायणी काठी म्हणून चिडवायचे सगळे. थोडक्यात ही शरीरयष्टी जेनेटिक आहे. तिला नाइलाज आहे. बाकी धष्टपुष्ट रूबाबदारांच्या पुढे टिकाव धरेल असं व्यक्तिमत्व नसलं तरी मी कामाच्या जोरावर पुढे जाऊ शकतो इतपत समज येईपर्यंत तिशी गाठली गेली. त्यात माझ्या पत्नीची साथ होती. नंतर मात्र मी वळून मागे पाहिलं नाही. आज आपल्यात कित्येक असे आहेत, जे शाळेत फिट होते, आता त्यांची पोटे सुटलीहेत, गरगरीत भोपळ्यासारखे काही आहेत. त्यांना

विविध विकार आहेत. कित्येक जण वजन कमी करण्यासाठी आटापिटा करताहेत. कुणी म्हणतं मला, तुझ्या फिटनेसचं रहस्य काय? मला हसू येतं! मी आणि फिटनेस! आणि मला त्याचं रहस्य विचारताहेत? असो. लाइफ हॅज कम लाइक अ बिग सर्कल अप टू धिस पाॅइंट!

तर मित्रांनो, आता आपल्या आयुष्याच्या इनिंगचा दुसरा भाग, म्हणजे उत्तरार्ध सुरू आहे. वैद्यकीय दृष्ट्या काही कुणी म्हणोत, आयुष्यात या वयात तीन फिटनेस हवेत. एक फिजिकल, दुसरा मेंटल नि तिसरा फायनान्शियल. यात सर्वांत महत्वाचा तो मानसिक फिटनेस. मन नुसतं शुद्ध नव्हे तर बळकट बनवलं तर आयुष्यात कुठल्याही परिस्थितीत तरून जाता येईल. हेल्थ इज वेल्थ म्हणत तब्येत सांभाळणे नि गरजा कमी करत आर्थिक स्वावलंबनाची तरतूद करणे ह्या तीन फिटनेस वर आयुष्याचा आनंद अवलंबून आहे. आयुष्याची पंचवीस तीस वर्षं सुकडेपणाने न्यूनगंडात वाया घालवली, पण त्यातून बाहेर आलो ते मानसिक ताकदीच्या जोरावर. मी तोच आहे. तसाच आहे. पण परिस्थितीचा स्वीकार केल्यावर तेच जग वेगळं दिसायला लागलं. कुणीतरी म्हटलंय, जी परिस्थिती बदलण्यासारखी आहे ती बदलण्याची ताकद येऊ देत. ती बदलता येत नसेल तर तिचा खुल्या मनाने स्वीकार करून जगण्याची हिंमत मिळू देत. आणि ह्या दोघा परिस्थितींतील फरक समजण्याचा शहाणपणा मिळू देत.. तो जेव्हा येतो तेव्हा सुकड्या काय नि लुकड्या काय.. काठी काय नि अंगकाठी काय.. पैलवान नाहीतर काडी पैलवान, कुणी काही म्हणो.. नीट विचार केला तर आपापलं आयुष्य शांतपणे जगता येतं.. एव्हरीथिंग इज इन द माइंड! माइंड युवर माइंड वेल! आणि माइंडिंग युअर माइंड इज युवर रियल बिझिनेस!"

सुकड्यानं भाषण मनापासून केलेलं. त्याचं सुकडेपण त्याने शारिरिक दृष्ट्या नसेल पण मनातून मागे सारलेलं. सुकडेपणा तसाच असला तरी त्याबद्दल आता ना खेद ना खंत. तो तसाच सांभाळत इथवर पोहोचलेला म्हणावं तर त्याने त्यातून आपल्या आयुष्याचं जणू तत्वज्ञान बनवलेलं. पदरी मिळालेल्या आयुष्याचा बऱ्यावाईटासकट आनंदाने स्वीकार करण्याचं तत्वज्ञान! आपल्यासारखी लहान लहान माणसं आपापलं असं तत्वज्ञान जगू लागले की जीवन किती सुकर होईल की नाही?

सुकड्याचं त्यादिवशीचं तत्वज्ञान ऐकून मनात म्हटलं, ह्या व्यंकटेशाला सुकड्या नव्हे, तर सुकडोजी म्हणायला हवं! तुकडोजी महाराज नावाचे राष्ट्रसंत होऊन गेले. तसा हा, सुकडोजी. सुकडोजी महाराज!

# सोमण आजोबा

आजच सोमण आजोबा गेले. अचानक. अंत्यदर्शनाला रीघ लागलेली. माझी अपेक्षा होती तसेच होते अगदी शेवटच्या क्षणी. चेहऱ्यावर हसू तसंच होतं. अगदी शांतपणे आलेला मृत्यू. जाण्याआधी यमराजालाही त्यांनी दोन क्षण हसवले असणार. पण आजोबा असते तर म्हणाले असते, यमराजच नाही तर त्याच्या रेड्याला ही हसवता यायला पाहिजे! हसवले ही असेल कदाचित त्यांनी.

सोमण आजोबा कुणी प्रसिद्ध व्यक्ती नव्हते. एक सर्वसामान्य मध्यमवर्गीय आयुष्य जगलेले. पण आमच्या इमारतीतल्या मर्यादित विश्वात सर्वांचे आवडते.

माझी सुवर्ण जयंती आणि आजोबांचं सहस्त्रचंद्र दर्शन.. दोन्ही एकाच दिवशी नुकतेच झालेले.

आमची जन्मतारीख एकच. फक्त तीस वर्षांचा काय तो फरक. आजोबानी ऐंशी गाठली तरी ते ताठ होते. घरात त्यांच्या शब्दाला मान होता. आवाज खणखणीत होता. तब्येत ठणठणीत होती. आयुष्यभरात पाळलेली नेहमीची शिस्त त्यांची, त्यामुळे शिस्तबद्ध आयुष्याचे फायदे आता दिसत होते.

वाढदिवसाचं काय? पन्नासावा वाढदिवस खास साजरा करावा असं काही नाही. तरी थोडंफार सेलिब्रेशन होतंच. म्हटलं, पन्नासाव्या वाढदिवसाला पन्नास किलोचा पन्नास फूट लांब नि पन्नास सेंटीमींटर जाडीचा केक मागवावा. त्यावर पन्नास मेणबत्त्या लावाव्या नि पन्नास फुंकरींत विझवू त्या. पाचपन्नास लोक येतील.

पन्नास वेळा टाळया वाजवतील नि पन्नास वेळा वाढदिवसाच्या शुभेच्छा देतील. पन्नास मिनिटांत सगळे आटोपून टाकू! पण आजोबांच्या घरी काय? सगळं ऐंशीच्या पटीत? सोमणांच्या घरात मात्र सहस्त्रचंद्र दर्शनाचा सोहळा होता. माझ्या सुवर्ण महोत्सवासाठी आमच्याकडे मात्र पन्नास मिलीमीटरची पन्नास रूपयांची पॅस्ट्री मागवली गेली!

सोमण आजोबा, खरे तर मी त्यांना आजोबा म्हणावे असे नाही. मीच आता काका किंवा अंकल पदावर चढलोय. तर त्यांना आजोबा कसा म्हणणार? लहानपणी मी त्यांना काका म्हणायचो. पण आता आजूबाजूच्या लहान पोरांनी हळूहळू त्यांना आजोबा बनवलं. मग ते सगळयांचेच आजोबा झाले. सोमण आजोबा. आजी होत्या, एक दोन वर्षाआधी गेल्या त्या, त्या देखील त्यांना 'सोमण आजोबा' अशीच हाक मारायच्या. आजोबा सगळीकडे फेमस होते. साऱ्या लहान पोरांचे तर होतेच पण मोठ्यांचे देखील. माझ्या वयातल्या कित्येक

जणांचे वडील सोमणांच्या बरोबरीचे. बहुतेक देवाघरी गेलेले. लहान मुलांसोबत माझ्याबरोबरचे कित्येक जणही आता सोमणकाकांना सोमण आजोबाच म्हणतात. आजोबा ही सगळ्यांना तशीच माया लावून आहेत. इमारतीतल्या गणपती उत्सवात आजोबा नेहमी पुढे. दिवाळीत त्यांचा उत्साह अजूनही तसाच. आजी गेल्यानंतर थोडे दिवस ते मलूल झाले, पण लवकरच सावरले.

संध्याकाळी इमारतीच्या आतल्या बागेत एका बाकावर आजोबा बसून विचार करत असतात. माझी परत येण्याची ती वेळ. कधी बोलणं होतं..

"काय आजोबा? कसला विचार?"

"अरे काही नाही.. घराला आणि गोठ्याला कुठले पत्रे लावू? लहानपणी एव्हरेस्ट पत्रे लावायचेत बाबा.. आता कुठले?"

मला आठवलं, लहानपणी रेडिओवर ही एव्हरेस्ट सिमेंटच्या पत्र्यांची जाहिरात यायची. आजोबा मूड मध्ये असले की असेच काही बोलायचे.

एकदा भेटले तेव्हा हातातली काठी आपटत म्हणालेले,"अरे, ते सिंकारा मिळतं कां अजून? ते पिऊन नाचेन म्हणतोय!"

सिंकारा नामक कुठल्यातरी टॉनिकची जाहिरात पूर्वी यायची त्यात तो जाहिरातीतला माणूस ते दोन चमचे टॉनिक पिऊन टणाटण उड्या मारायचा! आजी होत्या तेव्हा तिला चिडवायला एकदा ते संतूर साबण घेऊन आलेले.. म्हणाले, "त्वचासे आजीबाई जवान दिखेगी.. कोणाला पत्ता लागेल तू पंच्याहत्तरी गाठलीस म्हणून?" त्या दिवशी सोमण आजींचा पंच्याहत्तरावा वाढदिवस होता!

आजोबा असे सदैव हसत हसवत असायचे. ऐंशीव्या वर्षी देखील जुने पुराणे गंमतीदार संदर्भ काढायचे. आवाज खणखणीत, स्मरणशक्ती ही तशीच.

आजी गेल्या त्यानंतर एकदा इमारतीत खाली एकटेच बसलेले.

"कसे आहात आजोबा?"

"कसा असणार? संध्याछाया भिववती हृदया म्हणावे तर तशी भीती नाही रे. जगून झालं, आता काही बाकी नाही."

"असं का म्हणताय? सगळे आहेत घरी.."

"तसं नसतं. आयुष्य ही महा कठीण गोष्ट आहे. जेवढे जगावेसे वाटते ना, तेवढेच कठीणही. मी ते सोपे करून जगण्याचा प्रयत्न करतो पण तसं ते आपल्याला जगू देईलच असं नाही. जेव्हा साथ हवी तेव्हाच एकटे पाडलं.. पन्नासहून जास्त  वर्षांची साथ, पण असं होणारच. कुणी ना कुणी पुढे जाणारच. कुणीतरी एकटं राहणारच.. जगरहाटी ती. अमरपट्टा घेऊन आलाय कुणी?"

आजोबा हळवे होणं साहजिक होतं. मग एकाएकी म्हणाले,"सोड रे. एकदा मी हिच्यासमोर संध्याछाया भिववती हृदया म्हणालेलो ना.. तर ही म्हणालेली.. सोमण आजोबा, या वयात संध्या काय नि छाया काय? कुणाकुणाची आठवण काढताय? बाकी तुम्हाला घाबरवणारच त्या! बोळकं सांभाळा तोंडाचं!"

"पण आजोबा तुम्ही कधी गंभीर झालेले दिसला नाहीत मला.. हसा नि हसवा.."

"ते काय आहे.. आयुष्याच्या वाघाला वाघ म्हणा तरी खातो, वाघोबा म्हणा तरी खातोच. त्यापेक्षा वाघुल्या म्हणावं नि अस्वलासारख्या गुदगुल्या कराव्यात त्याला. कशाला सीरियस व्हायचं? लोक दोन चुका करतात. एक

स्वत:ला शहाणे समजतात.. त्यांचा इगो त्यांना बाकी काही अलाऊच करत नाही. मग सगळं त्याच चष्म्यातून पाहिलं की गडबड. कावीळ झालेल्याला जग पिवळं दिसतं म्हणतात. यातच मग सगळे भेदभाव येतात. जात, धर्म, पंथ नि काय काय अजून! लोकांना आपल्या नावाचा नि आडनावाचा ही गर्व असतो! जे जन्मावर अवलंबून नि ज्यात तुमचं कर्तृत्व शून्य त्याचा कसला गर्व नि अभिमान? मग करा भांडणं. आणि दुसरं, धन दौलत वगैरे. याला नको तितकं महत्व देतात. दुधारी तलवार आहे ती. जितकी गरजेची तितकीच जपून हाताळायची. नाहीतर स्वत:लाच इजा करते ती. पैशापायी माणसं तोडायची, इस्टेटीपायी भांडणं करायची नि मग मन:शांती नाही म्हणून औषधं खायची. कुठल्या गोष्टीला किती महत्व द्यायचं ते आपलं आपणच ठरवलं की लाइफ इज व्हेरी सिंपल. उगाच ते कॉंप्लिकेट करायचं नि ओरडत सुटायचं.. एकतर ते क्षणभंगुर आहे नि आलेला क्षण आनंदात घालवला नाही, तर आयुष्य वाया घालवणं आहे. मर्यादित आयुष्याला किती गंभीरपणे घ्यायचं? त्यापेक्षा लिव्ह ॲंड लेट लिव्ह. हसा नि हसवा आणि हसू द्या! सिग्नल प्रिन्सिपल ठाऊक आहे तुला?"

"असं काही असतं?"

"नसेल! पण मी बनवलंय समज. आपल्याला हव्या त्या सर्व गोष्टी म्हणा, किंवा अजून काही म्हणा यांचं तीन भागात विभाजन करायचं. आपल्याला त्या मिळाल्या नाहीत तर काय करायचं याचंही त्याबरोबरच विभाजन करायचं. सिग्नलचे तीन रंग आहेत तसे. काही गोष्टी आयुष्यात कधीच करायच्या नाहीत. अगदी साधं उदाहरण, चोरी. काही सांभाळून करायच्यात. मोठे व्यवहार करायचे नाहीत असं नाही पण सांभाळून. कदाचित ताक फुंकून पिल्यासारख्या नि काही सहज अगदी. माणसामाणसातले व्यवहार.. हे व्यवहारी पातळीवर नकोत तर

अगदी सहज, वरवरचे देखावे काम येत नाहीत तिथे. आणि परिस्थिती आपल्याला देत असते त्या रिस्पाॅन्सेस ला आपण काय प्रतिसाद द्यावा? लाल रंग.. जस्ट लिव्ह इट. मधला रंग म्हणजे गिव्ह अ मेझर्ड रिस्पाॅन्स. आणि तिसरा, जगा अगदी मुक्त पणे! आता या तीन रंगात कोण काय काय विभागून टाकेल हे ज्याची त्याची आयुष्याची समज किती यावर अवलंबून. खरा शहाणपणा हे शिकण्यात आहे रे. जे बदलू शकत नाही त्याचा स्वीकार करावा पण मुळात काय बदलू शकत नाही आपण हे समजणं म्हणजे आयुष्याची समज!"

आजोबा त्यांच्या आयुष्याचे तत्वज्ञान सांगत होते. तेच त्यांच्या तंदुरूस्तीचं रहस्य असावं. आजी पण अशाच होत्या. सदा हसतमुख. दोघेही आधीपासून असेच होते की कोणाला कुणाचा वाण नि गुण लागलेला कुणास ठाऊक. आता दोघे ही काळाच्या पडद्याआड गेले. जगाच्या दृष्टीने कुणी मोठे नसतील ही ते, पण अशा छोट्या छोट्या माणसांच्या मोठेपणानेच जग नीट चालत असावे.

त्या ऐंशीव्या वाढदिवसानंतर एकदा भेटलेले आजोबा. नेहमीप्रमाणे संध्याकाळी बागेतल्या बाकावर बसलेले.

"कसं काय आजोबा?"

"छान. छानच म्हणायचे. लागले नेत्र रे पैलतीरी."

"असं का म्हणताय? सगळं मजेत आहे.. एक आजी सोडून गेल्या ते सोडून.."

"ते खरंय."

"सगळ्यांना तुमचा आधार आहे. घरातलेच नाहीत तुमच्या, तर पूर्ण इमारतीतल्या लहान मोठ्यांना आधार आहे तुमचा.."

"असणार.. पण त्या दिवशी माझ्या स्वप्नात माझी आई आली. मी चाळीसेक वर्षाचा होतो तेव्हा आई गेली. मग वडील गेले. गेले चाळीस वर्ष माझ्याहून मोठं असं कोणीच नाही. मीच मोठा. कधी वाटतं कुणीतरी मोठं हवं रे. आईची आठवण त्या दिवशी खूप आली. आज या वयातही वाटतं, ज्याच्याकडे हट्ट करता येईल नि थोडंफार वेड्यासारखं वागता येईल असं कोणीतरी हवं. आईच्या मांडीवर डोकं ठेवून चाळीस वर्षं झाली.. स्वर्ग वगैरे आहे की नाही ठाऊक नाही. पण वाटतं तो असायला हवा. माझी आई तिथे असेल, ती भेटायला हवी. कितीही मोठे झालो तरी आपल्याहून मोठं कुणीतरी हवं.."

ऐंशीव्या वर्षी आईच्या आठवणीत हळवे झालेले आजोबा. नेहमीप्रमाणे त्यानंतर त्यांनी न विषय बदलला न काही गंमतीशीर बोलले. फक्त गप्प बसून दूरवर बघत राहिले.

त्यानंतर दोनेक दिवसात आजोबा देवाघरी गेले. वाटलं आजोबांची त्यांच्या आईला भेटायची तीव्र इच्छाच त्यांना तिकडे घेऊन गेली असणार. वाटलं, खरंच स्वर्ग वगैरे असायला हवा. त्यांना आई भेटायला हवी..

- पण भेटली असणार. वर जाऊन आईच्या मांडीवर डोकं ठेवून आजोबा निजले असणार. देवाघरी गेलेल्या आजोबांच्या चेहऱ्यावरचं हसू तेच तर सांगत असणार..

# जाल वकील

जाल वकील आडनावानेच नव्हे तर व्यवसायानेही वकील होते. पारशी लोकांत पाळण्यात पाय पहायची प्रथा म्हणा किंवा सोय म्हणा असते की नाही ते ठाऊक नाही. पण नौशेरजी आणि फ्रिडा वकीलांना आपल्या डिकराचे भविष्य पाळण्यातले पाय न बघताही कळले असावे. असलं मज्जानु लाइफ जगणार हा बालक, आपले जाल फेकेल नि समद्यांना जाल्यात ओढेल.. त्यासाठी वकीली व्यवसायाखेरीज अधिक योग्य व्यवसाय कोणता असणार? तेव्हा नौशेरसुताचे नामकरण 'जाल' म्हणून करण्यात मोठाच द्रष्टेपणा त्यांनी दाखवला म्हणावयास हवे!

जाल वकीलसाहेबांनी वकीली सुरू केली तेव्हा तशी घरची पार्श्वभूमी नव्हती.

घरचा व्यवसाय वेफर्स तळून विकण्याचा. 'नौशेर वेफर्स' म्हणून भर बाजारात दुकान चालवायचे नौशेरजी. जाल मात्र घरातल्या व्यवसायात रमेना. भाषेवरची पकड, गोल गोल नि जरूर तेव्हा गोड गोड बोलण्याची बोलबचनपणाची सवय आणि कोणाला पटवताना किंवा फसवताना वडाची साल पिंपळाला हातोहात लावण्याची हातोटी ह्या गुण समुच्चयासाठी वकीली धंदा एकदम फिट होता. वेफर्ससारख्या वेफरथिन मार्जिनवाल्या धंद्याहून हा वकीली धंदा बरा! कॉलेज वयातच जाल ने हे ओळखले नि थेट वकीलीचा अभ्यास करून सनद घेऊन टाकली.

अर्थात हा निर्णय सहज सोपा नव्हता. जाल तेव्हा ऐन तारूण्यात होता. तरणाबांड, रगेल नि थोडाफार रंगेलही. रंगीबेरंगी कपड्यांची नि तशाच रंगीबेरंगी आयुष्याची सवय असलेल्या जालला वकीली पेशातील श्वेतश्याम वस्त्रे घालून आयुष्याचा कृष्णधवल दुरंगी बेरंग करणे जिवावर आलेलं. त्यात वकीलांच्या ऑफिसात मांडून ठेवलेली जाडजूड पुस्तकं त्याला भिववत. इतका अभ्यास परवडणार नाही.. पण त्याची तेव्हाची मैत्रीण फरीदा बाटलीवाला .. तिने पटवून दिले, 'अरे कपडा रंगीन नाय तर काय झाला.. लाइफ तर रंगीन होईल का नाय? इमॅजिन, तू कोरटात उभा, मायलॉर्ड मायलॉर्ड बोलत.. क्लाएंट आला की घ्यून टाक पुढली डेट.. अन मग तू वकीलीची फी काउंट करतोय.. मज्जानु लाईफ!'

लग्नाआधी मैत्रिणीचं आनंदाने ऐकण्याची सवय सर्व धर्मियांत असावी. तीच गोष्ट लग्नानंतर पत्नीचा हुकूम म्हणून शिरसावंद्य मानण्याची धर्मनिरपेक्ष सवयही असावी! तर तेव्हा फरीदा त्याची गर्लफ्रेंड होती. अन तिच्या मताला तेव्हा तितकंच महत्व होतं. तेव्हा 'एक मैत्रीण व्रत' पालन करणाऱ्या जाल वकीलने वकीली व्यवसाय पत्करायला ही अशी पार्श्वभूमी होती.

वकीली करावी नि त्यातून लोकांना मदत करावी.. 'अन्यायावर मात करत न्याय मिळवून द्यावा' अशा उदात्त विचारांचा उच्चार करून वकीली तर सुरू झाली. पण गिऱ्हाइकच नसेल तर अन्याय कोणावरचा कसा दूर करणार? राजकारणी लोक अडल्यानाडल्यांची सेवा करतात. तसे आपल्याभोवती अडले नाडले जमवतात नि सेवा करून सोडतात किंवा लोकांना अडवून वा नाडून तसे अडलेले नाडलेले तयार करून घेतात नि त्यांची  सेवा करून आपले ब्रीद पाळतात. तसे काही करावे का?

जाल ने आपले जाल पसरवावे कसे याचा विचार केला. 'ग्राहकाचे समाधान हेच आपले ध्येय' हे ब्रीदवाक्य बोर्डावर छापून घेतले. वर्षानुवर्षे राजकारणी आश्वासनं देतात त्यावर विसंबून लोक त्यांना मत देऊन सत्तेवर विराजमान करतात.. तेव्हा अशा 'विश्वासू' जनतेचा विश्वास आपल्या ब्रीदवाक्यावर बसणारच याचा विश्वास ॲड.जाल वकील यांना वाटला असेल तर यात अविश्वसनीय काही नसावे! लोकांनीही मग विश्वासाचा घात न होऊ देता ॲडव्होकेट साहेबांच्या वकीली व्यवसायास हात दिला. जाल साहेबांचे जाल कोर्टात पसरू लागले. त्यात गिऱ्हायकं अडकू लागले. तारीख पे तारीख पडायला लागल्या. साहेबांचा बँक अकाउंट फुगायला लागला.

जाल वकीलाचे तोवर रीतसर लग्न लागलेले. फरीदा बाटलीवाला मिसेस फरीदा वेफरवाला ऊर्फ फरीदा वकील बनून रीतसर घरी आली. फ्रिडाबाईंशी म्हणजे सासूबाईंशी रीतसर खटके उडवायला लागली आणि फरीदा नि जाल वकील दोघांनी रीतसर भाड्याच्या घरात प्रस्थान ठेवले. नौशेर नि फ्रिडाच्या पुराण्या पारशी ट्रेडमार्कवाल्या घरात आता नौशेरवान नि फ्रिडा दोघंच लपाछपी खेळतील एवढी जागा झाली.

फरीदा नि जाल.. जाल तर पेशाने वकील नि फरीदा, जाल ला त्याची चाल बदलायला लावेल अशा चालीची. तेव्हा भाड्याच्या घरात भाडयाने राहून पैसे कमवण्याचे सोपे उपाय त्यांनी शोधले. मोठे घर घ्यावे नि त्यातील एका खोलीत पोटभाडेकरू ठेवावा.. वकीली ज्ञानाचा वापर करून बनावट कागदपत्रे बनवून त्या भाडेकरूस बनवावे.. भाड्याच्या घराच्या मूळ मालकास वेळेवर जागा न देता ती सोडण्यासाठी पैसे मागणे.. जाता जाता त्याच घरातील होईल तितके सामान काढून नेणे.. जमले तर जाण्याआधी कुणाला तेच घर भाड्याने देऊन टाकून नामानिराळे राहणे.. डिपाॅझिटचे पैसे गिळंकृत करणे.. या सर्वांसाठी आपले वकीली व भाषा नि संवाद कौशल्य वापरात आणणे.. फरीदाचा या सर्वांमागचा मेंदू नि अंमलात आणण्याचे काम जालसाहेबाचे! जाल साहेबाचे वकीली व्यवसायाने पोलिसांबरोबर उठबस होतीच. पोलिसांसोबतचा आपला फोटो आपल्या भाड्याच्या घरात दर्शनी लावून तो मिरवला की घरी येणारा आधीच दबून राही. तोच फोटो मग वेगवेगळया ठिकाणी टाकून आपली वट वाढवत जाल नि फरीदा कित्येक वर्ष जागा बदलत नि आपला बँक अकाउंट फुगवत ऐषोआरामात जगत राहिले.

वकिली व्यवसायाचा धंदा करून बरकत कमावलेल्या जाल वकीलाचे चरण्याचे कुरण असलेला 'कायदा' शेवटी सांगतो ते काय? तो सर्वांना समान असतो म्हणे! त्यात तो गाढव ही असतो. कायदे करणारे मात्र गाढव नसतात. ते अतिहुशार त्यात चोर वाटा नि पळवाटांची सोय अतिहुशारीने करत असतातच. आणि कायद्याचा अभ्यास वर्षानुवर्ष करा, वकील व्हा.. सामान्यांना मात्र अभ्यास न करता ही कायद्याचे ज्ञान हवेच! तशी कायद्यानेच सांगितलेली बाब

आहे की कायद्याचे अज्ञान हा बचाव होऊ शकत नाही! आणि जितके कायद्याचे ज्ञान अधिक तितक्या पळवाटा जास्त ठाऊक वकिलाला. कायदा मोडणे हा गुन्हा नव्हे तर त्यात पकडले जाणे हाच गुन्हा असतो तिथे जाल साहेबांना आपले जाल पसरवायला आदर्श स्थिती. नि त्यात जाल साहेब स्वत:च जाली असल्याचा संशय आला तरी त्यांना कायद्याच्या कचाट्यात अडकवणे मुश्किल. कारण पळवाटांचा त्यांचा अभ्यास पक्का!

माझा जाल वकील या माणसाशी संबंध यायचा अधूनमधून तो माझ्या 'वाजले की बारा' साप्ताहिक सदरामुळे. सदर सदर मी 'साप्ताहिक बुरूज' साठी 'गोफणगुंड' या टोपणनावाने लिहायचो. टेहळणी करताना दिसणारे काही, आढळलेले काही रिपोर्टिंग करताना एखाद्याचे बारा वाजवायचे असतील तर मात्र संपादकाची परवानगी लागे. जालच्या जाळ्यात अडकलेल्यांच्या काही घटना मी जालचे नाव घालून लिहिलेल्या. संपादकीय 'संस्कारात' त्यातील जाल वकील हे नाव नाहीसे होऊन 'एक प्रथितयश वकील' असे सर्वनाम यायचे. जाल वकिलांची काय जादू असेल कुणास ठाऊक. कारण संपादकांची कधी त्याच्याशी सलगी असल्याचे पाहिले नव्हते मी.

अशा जाल वकीलासारख्या कोणाचा मला फोन येणे हे एखाद्या अघटिताहून कमी नव्हते. मी तसा निरूपद्रवी पत्रकार म्हणून गणला जायचो. अगदी पत्रकार कोट्यातून घर ही न घेतलेला. माझ्या टोपणनावी उपक्रमांबद्दल संपादकांखेरीज कुणास ठाऊक नसायचे. तर जाल वकिलांस माझी गरज कशासाठी पडावी? पत्रकार म्हणून अर्थातच अशा भेटी म्हणजे बातम्यांची बेगमी. कित्येकदा अशाच साध्या भेटी कव्हर स्टोऱ्या मिळवून द्यायच्या. त्यात

ही खुद्द जाल वकिलांची भेट. तसा जालचा इतिहास नि भूगोल मला तोंडपाठ होता. त्यामुळे त्यांच्या बोलण्यातले संदर्भ लागणे कठीण नव्हते. फक्त हा जाल नामक सिंह कोणत्या जाळयात अडकला की माझ्यासारख्या उंदराची त्याला गरज पडावी हाच खरा प्रश्न होता.

"अरे ये डिक्रा.. फरीदा जो ने कोण आवेला छे?" म्हणत त्यांच्या घरी माझे स्वागत झाले. त्यांची बायडी चहा घेऊन आली बाहेर.

"जालसाहेब, माझ्याकडे काय काम?"

"काम अन काम.. तुला दुस्रे सुचत न्हाय काय? साला पत्रकार कसा पाह्यजे?"

"तसं नाही साहेब. मी मामुली पत्रकार. आमचे संपादक मोठे असतील पण मी म्हणजे किस खेत की मुली.."

"साला गंडवते आमाला? ते साप्ताहिक बुरूज मध्ये तू लिहिते हे आमाला ठावक न्हाई वाटतं तुला? पन तो प्वाइंट न्हाई. साला मज्जानुं लिहिते तू.. चाय घे नी, अद्रकवाळी छे.. फरीदा एने मावानुं केक आप नी.."

संपादकांचे नि या जालचे काहीना काही संबंध असणार इतका अंदाज आला मला, त्याशिवाय माझ्या लिहिण्याविषयी कसे ठाऊक असणार यांना? फरीदाबाय आत गेली.

"साला तुला सांगते, वकिली धंद्यात तो पह्यला मजा न्हाय ऱ्हायला. नवीन नवीन करायला पाह्यजे कायतरी.."

अचानक मला वाटायला लागले, जाल वकील नवा पेपरबिपर तर काढत नाहीये ना? कदाचित इंग्रजी? त्यात संपादक, नाहीतर उपसंपादक म्हणून मला काहीतरी..

त्या दोन मिनिटांत मी माझीच परीक्षा पाहून टाकली. जाल सारख्या व्यक्तीने अगदी वन्स इन ए लाइफ टाइम संधी दिली तर ती न घेणे मला जमेल? किंवा परवडेल? आजवर पत्रकार म्हणून पथ्ये पाळली, ती पैसा नि पोझिशन समोर दिसत असताना मी पाळेन? की महाजनो येत गत: स पंथ: म्हणत मी त्या वाटेवर जाईन? त्यातल्या त्यात या तडजोडींना काहीतरी तात्विक मुलामा देत? संपादकाचा रूबाब नि हातातील खरीखोटी ताकद यांचा मला लोभ वाटणार नाही? खरे सांगतो, या प्रश्नाचं उत्तर मला मनाशीही मिळालं नाही. कारण एकच, जालसाहेबाची तशी काही योजना नव्हतीच. त्यामुळे माझी झाकली मूठ माझ्यासाठीही झाकलेलीच राहिली.

फरीदा मावा केक घेऊन आली. जालसाहेब म्हणाले,"हवे फरीदा विल टेक ओव्हर.."

त्यानंतर फरीदाबाई बोलायला लागल्या. त्यातून कळले ते हेच की, त्यांच्या योजनेतला मी एक प्यादं होतो. तसं कोणी थेट म्हणालं नाही, पण मी प्यादंच. पण इतका बिनमहत्वाचा माणूस ही कित्येकदा त्यामुळेच उपयोगाचा असतो. कुणाच्या डोळ्यात न येण्यासाठी असे निरूपद्रवी लोक उपयोगी पडत असावेत.

वकिली करूनसवरून आता जाल वकील कंटाळले होते. करून करून भागतात नि देवपूजेला लागतात लोक तसे आता हे नवीन काही करू पाहात होते. नवा काही त्यांना चॅलेंज हवा नि त्यांच्या असण्याला जनमान्यता हवी. अशा विचाराने भारलेले ते. सामान्यांची फसवणूक करण्याचे शालेय शिक्षण संपवून राजकारणात शिरून ग्रॅज्युएशन करण्याचा विचार करत होते. त्यात माझा रोल इतकाच.. 'एक्सवायझेड' पार्टीच्या आमदाराशी संधान बांधून देणे! त्यासाठी मीच का? तर गेल्या काही वर्षात माझे त्यांच्याशी संबंध चांगले आहेत ही बातमी त्यांना मिळालेली म्हणे! त्या आमदाराच्या करवी त्या पक्षाच्या मायनॉरिटी सेलमध्ये घुसणे हा त्यांचा सध्याचा अॅजेंडा.

हे तर झाले, पण त्यानंतर झाले ते भलतेच! म्हणजे मी त्या 'एक्सवायझेड' पार्टीशी संपर्क केला. भेटी घडवून आणल्या आणि चारच दिवसात साहेब 'एबीसी' पार्टीत रीतसर घुसले! 'अॅड.जाल नौशेर वकील यांचा एबीसी पक्षात प्रवेश' अशी बातमी झळकली. आजवर हे असले नेतेगणांचे पक्ष प्रवेश कुठल्या प्रवेश द्वारातून होतात, एखाद्या पक्षाला अशी काही खास प्रवेश द्वारं वगैरे असतात का हे प्रश्न मला आधी पडायचे. पत्रकार म्हणूनही ही कोडी माझ्या डोळयांदेखत झालेल्या या जाल वकीलसाहेबांच्या पक्ष प्रवेशानंतरही सुटली नाहीत! पक्ष प्रवेशच नाही तर 'एबीसी' पार्टीच्या मायनॉरिटी सेलचे अध्यक्ष म्हणून त्यांचा फोटोही लवकरच झळकला! पत्रकारितेत राजकारण जवळून पाहिलेले मी, पण हा अंदाज मला आला नव्हता. माझा उपयोग करून त्यांना दुसऱ्याच पक्षात जायचे होते. 'एक्सवायझेड' पक्षाची हूल ही बार्गेनिंग पाॅवर वाढावी म्हणून! आणि यात माझा उपयोग करून घेतला जावा नि मी तो

अजाणतेपणे करून घेऊ द्यावा? त्या जालसाहेबाच्या जाल मध्ये मी अलगद सापडून फसावे?

पण पन्नाशी गाठलेल्या जालसाहेबांचा हिशेब पक्का होता. राजकारणी बनल्यास जुनी पाटी पुसणे सहज शक्य नि नव्याने समाजकारणाच्या नावाखाली 'फिरूनी नवा जन्म' घेणे ही शक्य! तसा त्यांनी घेतलाच. पन्नाशी म्हणजे राजकारण्यांसाठी ऐन तारूण्य! तेव्हा नगरसेवक बनून त्यांनी जनसेवेचे व्रत घेतले. आता त्यांची आमदारकीकडे वाटचाल चालू आहे अशा बातम्या आहेत! गंमत म्हणजे मधून मधून बातमीदारी करताना नगरसेवक जाल वकील साहेब 'दिसतात'.. भेटतात नाही म्हणत मी. त्यांच्या घरी अद्रकवाळी चहा पिऊन नि मज्जानुं मावा केक खाऊन गेलेल्या मला ते ओळखही दाखवत नाहीत. तशी अपेक्षाही नाही म्हणा.

जाल वकीलांचे आईवडील द्रष्टे खरे! 'जाल' म्हणून नामकरण करताना आपला मुलगा तो इतके सार्थ करून दाखवेल अशी कल्पना असेल त्यांना? आधी काही थोड्या लोकांवर जाळे पसरून त्यात अडकवणारे वकील साहेब आता राजकारणी बनून अधिकाधिक लोकांना एकाचवेळी जाळ्यात अडकवू पाहात आहेत. पक्के राजकारणी ते.. आश्वासनांची जाळी फेकून मतांची मासेमारी करण्यात हातखंडा आहे त्यांचा. भावी आमदार म्हणून लोक पाहतात त्यांच्याकडे. त्यानंतर कदाचित मंत्री वगैरे.. जाल वकीलांचे मायाजाल आता विस्तारत राहिल..

- शेवटी 'जाल' या नावाला जागायचे आहे त्यांना!

# सुदाम.

सुदाम सदाशिव घोरपडे.

किंवा खरेतर सुदाम दामाजी दामले!

नावातच दाम नि दाम करी काम हे ठाऊक असलेला सुदाम. सुदाम तसा सदाचारी. उद्दाम पणाचा लवलेश नसलेला. मुद्दाम उद्दामपणा दाखवणारे गर्भश्रीमंत एकीकडे नि दामास कामाला लावणारा सुदामा दुसरीकडे. पैशाची लई भारी जादू ठाऊक असलेला नि त्याचा विनियोग करणारा सुदामा. कित्येकदा आपला बँक अकाउंट खरवडून खाली करणारा सुदामा. पैसा आपल्यासाठी आहे नि आपण पैशासाठी नाही हे तत्व जाणणारा सुदामा. दुदामा नाव नसतं कुणाचं. तसा विरूद्धार्थी शब्द ही नाही.

पण सु-दामा अशी त्याच्या नावाची फोड करावी असा तो सुदामा. अर्थात पाळण्यात पाय दिसावेत असे म्हणायला त्याच्या नशिबी पाळणा नसेलही त्याच्या जन्माच्यावेळी. घरची गरिबी. खरेतर दारिद्र्य. त्यात नाकर्तेपणाने येणारे दारिद्र्य वेगळे. दुर्दैवाच्या दशावताराने दुर्दशा करत दाखवलेले हे दुर्दिन. त्याच्या वडलांची पोराला मोठे करताना उडालेली त्रेधा. त्यात पाळण्यातले पाय कसले दिसायला? कदाचित कुणी कृष्ण भेटून हा सुदामा पोहे खाऊ घालील नि बदल्यात सुवर्णाचे दान प्राप्त करून घेईल असा काही हिशेब असला तर कोणास ठाऊक! असेल ते असो, सुदामा मोठा झाला तो अशा परिस्थितीत.

पैसा नि त्याची ताकद ज्याला कळली नसेल असा एखादाही मनुष्य नसेल या भूतलावर. पैसा नि त्याची ताकद किंवा जादू यांच्या जोरावर जगावर राज्य करणारे कुणी, त्याच एका पैशावर पोटाची खळगी भरून जीव जगवणारे कुणी. पैशाची ताकद सुदामालाही लवकरच कळली.. ती ही पैशाअभावी त्याच्या वडलांच्या मृत्यूमुळे. त्यात पैशाअभावी पुढे शिक्षण सुटले. पोटापुरता पसा पाहिजे म्हणत नोकरी पत्करणे आले. एका नोकरीत भागेना तेव्हा संध्याकाळची अतिरिक्त कामं करणे आले. दोन वेळची गाठ पडावी म्हणून जिवापाड कष्ट करणे आले नि यातून आली ती पैशाच्या ताकदीची जाणीव. पैशाचा छनछनाट नसेल तर जग शब्दानेही विचारत नाही. तेव्हा पैसा हवा.. अधिक पैसा.. या दुष्टचक्रात कित्येक जण अडकतात. सुदामा देखील अडकला पण त्या अर्थाने नव्हे. तर पैसा हवा.. गरजेपुरता हवा .. नि त्यानंतर अधिक हवा तो कुणाकुणाच्या गरजा भागवण्यासाठी.

दोन वेळचं पोट भरून झाल्यावर उरणाऱ्या धनाचं काय करावं? कारकुनाच्या गरजा त्या कितीशा असणार? त्यात अविवाहित.. व्रतस्थ राहिलेला. मग आयुष्यच झपाटलेले या पैशापायी. कमवावे नि अतिरिक्त पैशाचे दान करत रहावे. गरजू विद्यार्थी नि रूग्णांची कमी नाही आजूबाजूस. एकेकास शोधावे नि जमेल तितकी मदत करत रहावी. प्रसंगी बँक अकाउंटमध्ये खडखडाट होईतोवर.

'पैशाची किंमत ज्याच्याकडे तो नाही तोच समजू शकतो. पैसा वेळेवर असता तर मी अनाथ झालो असतो? आज अर्धवट शिक्षण सोडून कारकुनी करत असतो? जे मला नाही मिळालं ते देणार इतरांना. शेवटी दाम करी काम हेच खरं. त्यासाठीच तर सारी धडपड.'

सुदाम्याचे हे विचार त्याच्या डायरीत नोंदवले गेले त्याला कित्येक वर्षे झाली. सुदाम्याची नोकरी नि त्यातील पैशाची वाटणी सुरू राहिली. सुदामा वयाने वाढला. घरी एकटाच. त्यामुळे 'पैशाची ददात नाही' हे त्याचेच म्हणणे! एखाद्या सशाने स्वत:स सिंह मानावे असे. आपल्या घरी लक्ष्मी पाणी भरते म्हणायचा तो! ती कॉमन नळावरून बादली भरून नळावरच्या भांडणांसकट ते भरते हे मात्र तो कुणाला सांगेल? पण काही असो, सुदाम्याने आपलं व्रत सोडलं नाही हे खरं. कित्येकांना त्याने मदत केली, करत राहिला. लोक देवळाच्या दानपेटीत धन टाकून पुण्य एनकॅश करतात. सुदामा देवळाकडे फिरकला देखील नाही आयुष्भर तर त्या दानपेटीत टाकेल काय नि पुण्य कमावेल काय?

आपलं बरं चाललेलं आहे असं सुदाम्याला स्वत:ला वाटायचं. ते बघवत नसावं म्हणून की काय.. सुदाम्याला अकाली देवाघरचं बोलावणं आलं. की असा माणूस आपल्याकडे ही हवा म्हणून आलं असेल? हे त्या देवासच ठाऊक!

यमराज समोर उभे ठाकले. चल म्हणाले बरोबर. सुदामा तसा तयारीत होता. म्हणजे पाठीमागे सोडण्यासारखं काही नव्हतंच. निरवानिरव करायला पाठी कोणी नव्हतं. सुदामा मनाशी म्हणाला, चला, खेळ संपलाच. आता निघावे. मृत्युपत्राचं टेन्शन नाही नि पाठीमागे काही सोडलेच नसेल तर भावाभावांची नाहीतर भावाबहिणींची भांडणं नाहीत. टेन्शन असेल तर एकच.. आपल्या मागे सोडलेल्यांचे, ज्यांना मदतीची गरज असेल त्या साऱ्यांचे काय होईल आता? हा वारसा कोणी चालवेल पुढे?

स्वर्गस्थ झाल्या झाल्या सुदाम्याला भेटला तो त्याचा बालमित्र, प्रत्यक्ष श्री कृष्ण.

"आलास! ये!"

"तसा मर्जीने नाही कृष्णदेवा. वरून हुकूम आला नि प्रत्यक्ष यमराज रेडा घेऊन आले घ्यायला. मग आलो झाले."

"ये. पण.."

"माहितीय. परत जायचं नाहीये यावेळी हेच ना?"

"हुं.."

"त्यामुळे ना पुरचुंडी आहे पोह्यांची, न तू परत सोन्याचे पोहे देशील परत.."

"हुं.."

"तसेही नकोच आहेत ते मला. तू दाता आहेस. तेव्हा दिलेलेस, ते वापरावे लागले. बायको होती, मुलं होती त्यांच्यासाठी. आता माझ्याबरोबर कुणी नाही, न माझ्यामागे कुणी आहे मागे सुटलेले.. तेव्हा न दानाची गरज.."

"हुं.."

"कृष्णा तू नुसताच हुं म्हणणारेस की बोलशील काही?"

"काय बोलू? तुझे दातृत्व पाहून माझी बोलती बंद.."

"माझे दातृत्व? नि प्रत्यक्ष कृष्णदेवाची वाचा बंद व्हावी?"

"अरे, ज्याच्याकडे खूप काही आहे त्यातलं थोडं तो काढून देतो.. नि तू? तू देण्यासाठीच कमावत होतास.. ह्याला तोड नाही.."

"लाजवू नकोस देवा.."

सुदाम्याचा स्वर्गवास सुरू झाला. इकडे सुदाम्याच्या मृत्यूची पृथ्वीवर मोठी बातमी झाली. सुदाम्याने मदत केलेले कित्येक जण मनापासून हळहळले. त्यांना मदत करताना सुदाम्याची अट एकच असायची.. ज्याला त्याने मदत दिली त्याने पुढे अशाच कुणा गरजूला मदत करावी. ही अट देखील ऐच्छिक, पण सुदाम्याकडून मदत घेणारे सुदाम्याच्या प्रभावामुळे कोणतेही बंधन नसताना ती पाळत. अशा साऱ्या जणांची सुदाम्याच्या घरासमोर उस्फूर्त गर्दी जमली, खरेतर कुण्या राजकारण्याच्या मृत्यूनंतर असे झाले तर लाभार्थींची गर्दी म्हणता आली असती अशी!

गर्दी म्हटलं की बातमीवाले नि राजकारणी अशा दर्दी मंडळींस वर्दी मिळतेच.. थोडक्यात अशा गर्दीपासून बातमीदार दूर कसे राहतील? चोवीस तास बातमीच्या शोधात असणाऱ्यांना 'सुदाम घोरपडे' हा नवीन 'मसीहा' सापडला.. मरणोत्तर! त्याची बातमी झाली. लोकांच्या मुलाखती झाल्या. सुदामाच्या 'ग्रेटनेस'वर अगदी इंग्रजीतही बोलायला लागले बातमीवाले. जिवंतपणी कुणाच्या खिजगणतीत नसलेला सुदामा मरणोत्तर प्रसिद्ध पावला.

कुणी त्याला सुदामा 'दाम'ले म्हटलं तर कुणी सुदामा 'दामा'जी! कुण्या चॅनेलने उत्साहाच्या भरात त्याला राॅबिनहूड बनवून टाकले! त्याच्या दातृत्वाच्या कहाण्या रंगवून सांगितल्या गेल्या. चॅनेलीय चर्चेस लोक बसले नि दानाचे संदर्भ प्राचीन संस्कृतीशी जोडले गेले. कुणी त्यातल्या लाभार्थींची मुलाखत घेतली तर कुणी 'ऐसा भी होता है' म्हणत दिवसात नवीन ब्रेकिंग न्यूज मिळेपर्यंत सुदामाची बातमी एनकॅश केली. चर्चेत शेवटी चर्चिला गेला तो एक प्रश्न.. सुदाम्याचा वारसा चालवणार कोण? गर्दीलाही हाच प्रश्न पडला नि त्याचे उत्तर लगेच शोधायला फायनान्शियल कंपन्या पुढे झाल्या..

इकडे सुदाम्याच्या पार्थिवावर अंतिम संस्कार झाले नि आजवर अप्रसिद्ध सुदाम्याची शोकसभा भरवली गेली. नगरसेवकादी शासकीय प्रसिद्ध सेवक लोकं त्यात भाषणं ठोकून गेली. सुदाम्यास वर स्वर्गात ऐकू गेले असते तर आपल्या मोठेपणाबद्दल ऐकून त्याचा गळा भरून आला असता. 'अप अँड अबव्ह फायनान्शिल कंपनी' या नामांकित कंपनीने स्पाॅन्सर केलेली शोकसभा होती ती. कार्यक्रमात कोणतीही कसूर कशी करेल ती? मार्केटिंगची अशी नामी संधी सहजी मिळत नसते कुणाला. कार्यक्रमाच्या शेवटी कमीतकमी दरात देऊ केलेल्या सुलभ कर्जांबद्दल माहिती देणारी भाषणं तर त्या कंपनीच्या माणसांनी केलीच, नि त्या दिवसाचं औचित्य पाहून सुदाम्यास श्रद्धांजली म्हणून स्पाॅट कर्जावर अर्धा टक्का खास डिस्काउंटही देऊ केला..

- एकूण शोकसभेचा 'सोहळा' दृष्ट लागावासा झाला..

सुदाम सदाशिव घोरपडे.. किंवा खरेतर सु-'दाम' 'दामा'जी 'दाम'ले.. हे सारे वरून पाहात असेलही! आयुष्यभर वेगळ्या अर्थाने 'दाम करी काम' म्हणत जगत आलेल्या सुदाम्याला वरून बघताना खऱ्या अर्थाने जाणवत असेल, अशा प्रकारे ही दाम करी काम वेड्या.. दाम करी काम!

सुदामा तर गेला. त्याचा वारसा कुणी चालवत नाही, पण आता तिकडे आसान किश्तोंमें आसानीसे कर्ज मिळतेय.. 'अप ॲंड अबव्ह फायनान्स कंपनी' कडून. त्या कंपनीचा आर्थिक आलेखही दिवसेंदिवस अप ॲंड अबव्ह चाललाय.. सुदाम्याच्या शोकसभेचा खर्च दाम दुपटीने वसूल होतोय..

त्या अर्थानेही 'दाम' आपले काम करतोय असे आता म्हणायला हवेच! कै.सुदाम्याला तो अर्थ अभिप्रेत नसला तरी ही!

# बाबा टेलिफोनानंद.

श्री क्षेत्र अडगडपुरी. स्वामी अडगडानंद महाराजांच्या मठात आज आनंदीआनंद होता. स्वामीजी म्हणजे पंचक्रोशीतील एकमेव देवाचे अवतार. प्रत्यक्ष देवादिकांशी हॉट लाइनने महाराज बोलतात अशी गावोगावी वदंता होती. सामान्यांना मुळात देव म्हणजे काय किंवा कोण, सगुण की निर्गुण, साकार की निराकार वगैरे साधार शंका असतात. काही अतिसामान्य तर जो दिसत नाही त्याचे निराधार अस्तित्वच मान्य करायला तयार होत नाहीत. पण स्वामीजी असामान्य. इतरेजन आकाशाकडे नुसतेच पाहातात, स्वामीजींना मात्र तिकडे प्रत्यक्ष देवादिक दिसतात. कित्येकदा स्वामीजी आकाशाकडे पाहून हात वर करतात, काही खाणाखुणा करतात. प्रत्यक्ष भगवंताशी असे खाणाखुणांनी बोलणे झाले की त्यांच्या मुखकमलावर वेगळेच तेज चढल्याचे भक्तमंडळीना दिसते.

अशा तेज:पुंज स्वामींचे दर्शन घ्यायला गावोगावातून रीघ लागते. भक्तांच्या समस्या स्वामीजी क्षणात सोडवतात. ज्या सुटत नाहीत त्या भक्तांच्या पूर्वजन्मीच्या कर्माचे फल असल्याने त्या जन्मीच्या वाईट कर्मांपासून मुक्तीसाठी स्वामी कठोर व्रत सांगतात. भक्तगण तन, मन आणि अर्थातच धन अर्पून ते सारे करतात.

अशा स्वामीजींना ज्या दिवशी ज्ञान प्राप्ती झाली त्या दिवशी ते गडाबडा लोळलेले. गडाबडा लोळणारे म्हणून आधी 'स्वामी गडबडानंद' असे नामकरण झाले, पण या नावात काहीतरी गडबड आहे असे भक्तगणांस वाटले म्हणून त्यांनी स्वामींना 'स्वामी अडगडानंद' हे नाव स्वीकारावयास लावले. या गोष्टीलाही आता म्हणे दीडशे वर्षे उलटली. स्वामीजींचे सध्याचे वय एकशे त्र्याहत्तर. की ते एकशे पंच्याहत्तर असावे? यात मतभेद आहेत अजूनही. पण प्रत्यक्ष स्वामींकडे जन्मदाखला मागण्याचा विचारही कोणाच्या मनास शिवला नव्हता, एकतर इतक्या वर्षांपूर्वी जन्मदाखल्याची पद्धत नव्हती. जन्मलेला माणूस समोर असताना तो जन्मल्याचा पुरावा मागण्याचा आचरटपणा तेव्हा नसावा. आणि असता तरी स्वामीजींना त्याबद्दल विचारण्याचे औद्धत्य कोणी केले नसते. तसे स्वामी अडगडानंदांचे तीन जन्मदिन एका वर्षात साजरे होत. एक त्यांचा प्रत्यक्ष जन्म झाला तो, नि दुसरा ते दिव्य ज्ञान प्राप्तीसाठी बाहेर पडले तो. त्यानंतर ती ज्ञान प्राप्ती झाली तो सुमंगल दिन आजचा.

स्वामीजींबद्दल अनेक वदंता होत्या, गूढ होते. आणि या गूढतेचे वलय स्वामीजींच्या भोवतीच्या त्या तेजोवलयात विलीन होत ते वलय विस्तारत जात होते आणि पसरत चाललेल्या कीर्तीमुळे गावोगावच्या भक्तगणांत प्रथम इतर राज्यातील नि हल्ली तर देशोदेशातील भक्तांची भर पडत होती.

आज तो ज्ञानप्राप्ती दिन. या मंगल दिवशी भक्त गण देखील गडाबडा लोळत असत. असा हा पवित्र पावन अशा स्वामी अडगडानंदांच्या दरबारातील अतिपवित्र गडाबडा दिन. हा मोठाच सोहळा दर वर्षी होई. भक्त गणांसाठी मोठमोठे मंडप, त्यात खास भक्तांसाठी लोळण्यासाठी गाद्यागिरद्यांची सोय असे. सरकारातील उच्चपदस्थही तिकडे लोळण घेण्यासाठी येत. त्यांच्यासाठी खास परीटघडीच्या पांढऱ्याफेक धूत वस्त्रांची योजना होई. त्यांच्या लोळण्याचे टीव्ही चॅनेलवाले खास रेकॉर्डिंग करत. अशा प्रतिष्ठितांत सरकारातील उच्चपदस्थ, उद्योगपती, चित्रपटासृष्टीतले पैशाने मातब्बर नि तालेवार अशा सगळयांचा समावेश असे. त्या खालोखाल असणारे काही मिडलक्लास भक्त. ते स्वत:ची गादी घेऊन येत. ती अंथरून तिच्यावर लोळत.  बाकीच्या भक्तांसाठी सतरंजी, चादरी किंवा तत्सम काही अंथरले जाई. कित्येक भक्तगणांत या सतरजांच्या वाटपात चढाओढ असे. आपण दान केलेल्या जाजमावर इतर भक्तगण लोळल्याने आपला पुण्याचा संचय जलदगतीने होतो याबद्दल या भक्तांमधली अतीव भक्ती उचंबळून येत असे. शेवटी राहिले ते अतिसामान्य भक्त. त्यांच्यासाठी आजूबाजूचे उघडे मैदान हव्या तितक्या प्रमाणात उपलब्ध असे. भक्तगणांची अशी उतरंड तिथे असे. सर्व जण समान असतात पण काही अधिक समान असतात हे त्रिकालाबाधित सत्य त्या देवदरबारात ही दिसून येत असे. किंबहुना अशी उतरंड हीच त्या जगन्नियंत्याची इच्छा हे सर्वसामान्य नि जगन्मान्य मत होते. तेव्हा ही उतरंड ही देवाची इच्छा नि त्यामुळे स्वामींची ही इच्छा अशी भक्तगणांची श्रद्धा होती. त्यामुळे स्वामीजींच्या भक्तांतही ही उतरंड झिरपत असे. अध्यात्माच्या वरच्या पातळीवरचे स्वामींच्या जवळचे भक्त त्यांच्या मठात सारे काही व्यवस्थापन पाहात असत. त्या खालोखाल काही

दरबाराची सोय पाहात. बाकी काही सतरंज्या अंथरत. आणि उरलेले बहुसंख्य सामान्य भक्त स्वामीजींच्या दरबारात वरच्या पायरीवर पोहोचण्यासाठी भक्तीभावाने तन मन धन अर्पून प्रयत्न करत. अशी चार स्तराची चातुर्वर्ग योजना मठात असे.

या वर्षी ही हे असेच होणार. अतिशय उत्साहात नि भक्तिभावाने हा सोहळा होणार. सारा भक्तवृंद स्वामीमय होत गडबडा लोळणार. भक्तीच्या नद्या वाहणार, त्या अलोट पुरात जनसामान्य सचैल न्हाऊन निघणार.. पुण्यवंतांच्या फौजा रस्तोरस्ती दिसणार.. स्वामीजी भक्तगणांचे पापक्षालन करून पुण्यकर्म त्यांच्या अकाउंटमध्ये जमा करणार..

पण यावर्षी थोडे विपरीत घडावे असा ईश्वरी संकेत असावा. अर्थात स्वामीजींच्या दिव्य दृष्टीतून तो सुटणे अशक्य. तरीही प्रत्यक्ष ते घडले तेव्हा त्यादिवशी गडाबडा लोळण्यास तयार असणारे शिष्यगण गडबडून गेले..

बाजूच्या मोकळया पटांगणात नव्या कुणी चमत्कारी बाबानी रातोरात आपला आश्रम उभा केला. समारंभाचे वातावरण अडगडानंद स्वामींच्या आश्रमात, नि या नवीन बाबांचा नामफलक लागला.. 'बाबा श्री चमत्कारी सत्पुरूषानंद!' हे सत्पुरूष बाबा कुठलीच देणगी स्वीकारत नाहीत. आशीर्वादाला हात फक्त वर करतात, तेव्हा ईश्वरी प्रसाद म्हणून चमत्कार करत हाती येईल ते फूल भक्तास देतात. त्यांना स्वत:स काही नको. पण भक्तगणांनाच दिल्यावाचून राहवत नाही म्हणून नाईलाजाने आश्रमाबाहेर फक्त एक दानपेटी ठेवलेली. भक्ताने हवे ते दान तिकडे द्यावे. चमत्कारीबाबा तिकडे पाहात देखील नाहीत.. एका रात्रीत या नवीन बाबांची यंत्रणा कामाला लागली. अडगडानंद

स्वामींकडचा भक्तगणवर्ग आजच्या दिवशी अलोट गर्दी करणार, अशा आयत्या उपलब्ध भक्तगणांना चमत्कारी बाबांकडे वळवावे अशा हेतूने हा आश्रम तात्पुरत्या मंडपात सुरू झाला. भक्त गण ही कसले.. गडाबडा लोळून झाले की अधिकस्य अधिकं फलं म्हणत त्या आश्रमातही डोकावायला जाऊ लागले.

अडगडानंद स्वामी हे सारे पाहून आधी गडबडले. आध्यात्मिक क्षेत्रात अशी काँपिटिशन एकाएकी उभी राहिल याची त्यांना कल्पना नव्हती म्हणावे तर त्यांच्या सर्वज्ञानीत्वास झळ पोहोचणार. आहे ते स्वीकारावे तर त्यांची मोनोपा ॅली संपणार. पण पेचात पडतील ते स्वामी कसले? स्वामींनी चटकन हिशेब मांडला आणि त्यांच्याच आश्रमात घोषणा होऊ लागली, शेजारील चमत्कारी बाबांना स्वामीजींचा खास अनुग्रह मिळाला आहे.. भक्तगणांनी जाता जाता त्यांचेही दर्शन जरूर घ्यावे..

चमत्कारी बाबांचा डाव थोडाफार उलटवण्यात अडगडानंद स्वामींना यश आले खरे. पण काळाची पावले पाहणे ही तर स्वामीजींची खासियत. पुढेमागे चमत्कारी बाबाच काय पण अजून कुठला तरी स्वामी आजूबाजूस येऊन उभा ठाकेल. अडगडानंद स्वामींमुळे त्या भागास आलेले आध्यात्मिक महत्व, तिथे येणारे श्रद्धाळू आणि भाविकांचा सततचा राबता यामुळे तिथे एखादा आध्यात्मिक मा ॅल व्हावा. विविध स्वामी, महाराज, बाबांनी आपले भक्तिसाम्राज्य तिथे स्थापन करावे.. त्या एरियातले आद्य स्वामी अडगडानंदांना ही स्पर्धा पटणार तर नव्हती.. आणि पचणार तर नक्कीच नव्हती. स्वामींनी विचार केला, आपल्याकडे कॉम्पिटिशन कुठे नाही? आजवर त्या विभागातील अनभिषिक्त साधुपुरूष म्हणून अडगडानंद स्वामी मार्केटमधील फर्स्ट मुव्हर

म्हणून पुढेच राहणार. तरीही आपले नाममहात्म्य टिकायलाच हवे, त्यात वाटेकरी कशाला? चमत्कारीबाबासारखे वाटमारू वाटेकरी.. त्यांना वाटेला लावावे.. त्यांच्या भक्तगणांतील नेते नि पुढारी यांच्या आशीर्वादाने सहज शक्य आहे ते. पण आज एक बाबा गेला तर उद्या दुसरा येईल. त्याच्यापाठीशी अजून कोणी जास्त पाॅवरफुल पुढारी उभा राहिल.. तेव्हा याहून पुढचे पाऊल टाकायलाच हवे..

कुठल्याही बिझिनेसमॅनची व्यापारी दृष्टी अशी भविष्यवेधी हवी. फर्स्ट मुव्हर व्हायचे तर मार्केटचा आगाऊ अंदाज हवा. संधीचा अंदाज हवा. झालेच तर मार्केटही घडवता यावयास हवे. ग्राहक वर्गास नवनवीन गरजा निर्माण करून त्याची सवय लावता यायला हवी. ग्राहकवर्गास आपल्याशिवाय तरणोपाय नाही हे जाणवावयास तर हवेच, आणि मार्केटमध्ये आपल्यापर्यंत पोहोचणे सुलभ व्हावयास हवे.

स्वामीजींच्या तल्लख बुद्धीतून त्यांनी निर्णय घेतला. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग अशा गोष्टींसाठी होणार नसेल तर ते काय कामाचे? आज जे काही दिसते ते ऑनलाईन. सारे काही तंत्रस्नेही. फक्त एका क्लिकवर सारे काही पायाशी लोळण घेत असेल .. खरेतर क्लिक करणाऱ्या बोटाशी उपलब्ध होत असेल तर आपण ही का होऊ नये ऑनलाईन?

स्वामींनी विचार केला नि आपला नवीन अवतार घोषित केला.. ऑनलाईन स्वामीजी!

दुसऱ्याच दिवशी मग स्वामीजींच्या खास अशा डेप्युटी कर्मानंद स्वामींच्या खास प्रवचनाचे आयोजन करण्यात आले. स्वामी एरव्ही बोलत नसत. म्हणजे कधीकधीच बोलत असत.. बोलत म्हणजे त्यांच्या डेप्युटी स्वामी कर्मानंदांकरवी ते प्रवचन देत. तो प्रसंगही खास असे. किंवा जेव्हा ते बोलत.. म्हणजे कर्मानंदाकरवी.. तो प्रसंग खास म्हणवला जाई. स्वामीजींचा बोलण्यापेक्षा करून दाखवण्यात जास्त विश्वास हे भक्तांकडून सदैव ऐकवले जाई. बाकी भक्तगण हे ऐकून स्वामींच्या महानतेबद्दल अजूनच नतमस्तक होत. बाकी भक्ती मार्केटमधले इतर बाबा, महाराज, बुवा अखंड प्रवचने देतात त्याहून हे स्वामी वेगळे. स्वामींच्या दरबारात अखंड एकच धून वाजणारी रेकॉर्ड बॅकग्राउंडला असे.. 'जय जय स्वामी अडगडानंद भवसागर तरता.. जय जय स्वामी अडगडानंद भवदु:ख हरता..' भक्तगण मनातल्या मनात तो जप अखंड करत दरबारात स्वामींचरणी लीन होत. अशा दरबारात प्रवचनाचा प्रसंग..

हे प्रवचन खास असणारच हे निखालस खरे!

भक्तगण प्राण कर्णसंपुटात आणून ऐकत होते. स्वामींचा प्रत्यक्ष आवाज देखील ऐकावयास पुण्य संचय तितका व्हावा लागतो म्हणतात. तेव्हा उपस्थित श्रोतृ भक्त वृंद धन्य होऊन स्वामींचा एकेक शब्द कानात साठवत होता.. प्रथेप्रमाणे स्वत: स्वामी प्रथम दोन वाक्ये बोलत. तो स्वामीजींचा आवाज ऐकण्याचे भाग्य काही थोड्यांना मिळे नि ते कृतार्थ होत.

स्वामींनी दोन आशीर्वादात्मक वाक्ये म्हटली. ती कित्येक वर्षांपूर्वी पाठ केलेली त्यामुळे अगदी लीलया. मग कर्मानंद स्वामींनी सुरूवात केली..

"भक्तगणंगांनो.. ही दुनिया दुस्तर आहे. या भवसागरात या मर्त्य मानवास गटांगळ्या खावयाच्या नसतील, तर एकच उपाय आहे. स्वामीनामाच्या

जपरूपी जहाजावर बसून तरून जाणे. स्वामी कुठे नाहीत? जळी स्थळी काष्ठी पाषाणी.. चराचर व्यापून दशांगुळे उरलेले स्वामी. इतर निर्गुण निराकारांसमोर सगुण साकार प्रत्यक्ष परमेश्वरावतार.. तेव्हा ह्या कठोर दुनियेस सामोरे जायचे तर स्वामींना शरण जा.

पण आजचा विषय तितकाच मर्यादित नाही. विश्वव्यापी विश्वगुरू स्वामींना विश्वाची चिंता आहे. इथे अलोट भक्तगण लोटतो. आनंद आहे. आध्यात्मिक उन्नयनाची सामान्यांची ओढ पाहून स्वामी प्रसन्न होतात. पण स्थळ काळाचे बंधन ध्यानात आले की स्वामीजी चिंतित होतात. आपल्या अवतार नि कार्यकाळात जास्तीत जास्त जनांचे भले व्हावे अशा विचाराने स्वामी व्याकूळ झालेले कित्येक दिवस. तेव्हा स्वामींच्या नामस्मरणात रंगून गेलेल्यास जपान काय की रंगून काय.. सारे सारखेच वाटावे.. त्यासाठीच स्वामी आता ध्वन्यावतार धारण करीत आहेत.. आता स्वामीजी त्या परमेशाप्रमाणे त्याच्याच खास कृपेने सर्वसंचारी होणार आहेत. स्वामी अडगडानंदांचा ध्वन्यानंदी अवतार जगाच्या कानाकोपऱ्यात भक्तगणांच्या उद्धारासाठी उपलब्ध असेल. स्वामीजी दृश्य स्वरूपात असतीलच. त्यांचा हा मठ असेलच. इथे काही भक्तांसाठी ते आशीर्वचनासाठी असतीलच. पण जगाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या त्यांच्या इतर भक्तांच्या जवळ ते बारा महिने चोवीस तास कसे राहू शकतील? ईश्वरासही भक्तांची तितकीच गरज असते. तशी स्वामींना ही आहे. तेव्हा दूरध्वनीतून सर्व जगभर ते ध्वन्य अवतार उपलब्ध करून समस्त भक्तगणांच्या उद्धार करण्यासाठी हा नवीन अवतार धारण करत आहेत.."

भक्तगण मंत्रमुग्ध होऊन ऐकत होता. आता घर बसल्याही स्वामींचा आवाज ऐकावयास मिळेल. स्वामींचा आशीर्वाद पाठीशी राहिल..

"स्वामींनी यासाठी दोन सोयी भक्तांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत.. जवळच्या टीव्ही स्क्रीन वर दोन्ही प्रात्यक्षिके दाखवली जातील. जनांच्या कल्याणा स्वामींची विभूती.."

जनसमुदाय भक्तीत तल्लीन होऊन ऐकत होता. त्याने टाळ्यांचा एकच कडकडाट केला. समोरील स्क्रीन वर मग प्रात्यक्षिक सुरू झाले..

"श्री क्षेत्र अडगडपुर. त्रिखंड स्वामी अडगडानंद

महाराजांच्या चरणांनी पावन झालेली पुनीत भूमी. विश्वकल्याणासाठी आता स्वामींचा ध्वन्य अवतार. भक्तांसाठी कोठेही नि कधीही. अगदी जगाच्या काना कोपऱ्यातून स्वामीजी आपले आशीर्वाद देतील आता दूरध्वनीवरून.

फक्त आपले नाव व नंबर नोंदवा. त्यानंतर आपली नोंदणी देणगी जमा करा. आपल्याला त्यानंतर पुढील वर्षभरासाठी स्वामींशी थेट संपर्क साधता येईल.

त्यासाठी खाली दिलेल्या खास दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधा.

स्वामींच्या आवाजात आपल्याला आशीर्वचन ऐकू येईल.

त्यानंतर..

स्वामींचा जप व त्यांची आरती ऐकण्यासाठी एक दाबा.

स्वामींचे आपल्या नावाने आशीर्वाद घेण्यासाठी दोन दाबा.

स्वामींजींचा लाइव्ह व्हिडिओ बघून पाठीवर  व्हर्च्युअल हात फिरवून घेण्यासाठी तीन दाबा.

आपल्या समस्या कथन करून स्वामीजींकडे पाठवण्यासाठी चार दाबा.

स्वामीजींचे व्हर्च्युअल चरणामृत प्राप्त करण्यासाठी पाच दाबा.

स्वामीजींच्या मठातील खऱ्या प्रसादाच्या व्हर्च्युअल प्राप्तीसाठी सहा दाबा.

स्वामींच्या ऑफलाइन दर्शनाच्या नोंदणीसाठी सात दाबा.

स्वामींचे प्रवचनतुषार टिपण्यासाठी आठ दाबा.

स्वामींच्या चरणी दान अर्पण करण्यासाठी नऊ दाबा.

स्वामींच्या आश्रमाशी संपर्क साधण्यासाठी शून्य दाबा.

आपली देणगी वर्षभरासाठी असली तरीही स्वामीजींचे आशीर्वाद आयुष्यभर तुमच्या मागे राहतील."

भक्तसमुदाय स्वामीजींच्या या ध्वन्यावताराने अतिशय भारावून गेला. एकाएकी कुणीतरी बोलून गेला, "बाबा ध्वन्यानंद स्वामी की.."

पाठोपाठ प्रतिसाद आला,"जय!"

ते प्रात्यक्षिक पुढे सुरू राहिले..

"या बरोबरच स्वामीजींचे आपल्या भक्तांच्या कल्याणासाठी खास 'श्री स्वामी अवतार अडगडानंद ॲप' सादर करण्यात येत आहे. आपापल्या मोबाईलवर हे ॲप देणगीमूल्य देऊन डाऊनलोड करता येईल. वरील सर्व दूरध्वनी सुविधा या ॲपमध्ये देखील पुरविल्या जातील. स्वामीजींच्या भक्तवर्गास जगभरात आपल्या महाराजांचे आशीर्वाद मिळावेत म्हणून स्वामीजींच्या तंत्रज्ञानी भक्तांनी हे खास ॲप बनविले आहे. हे ॲप उघडताच स्वामींचा जयजयकार कानी पडेल. स्वामींना व्हर्च्युअल पुष्पहार अर्पण करणे, स्वामींची पाद्यपूजा करणे, त्यांच्या तोंडून आशीर्वचन श्रवण करणे, स्वामींची प्रवचने ऐकणे, स्वामींच्या आरतीत व्हर्च्युअली सामील होणे, स्वामींच्या

चरणकमलावर व्हर्च्युअल डोके ठेवणे, व्हर्च्युअल प्रसाद भक्षण करणे, स्वामींना ऑनलाईन धन अथवा सुवर्ण अर्पण करणे वगैरे सुविधा या ॲप मध्ये देण्यात येतील.

विचार करा, आता अडगडपुरात प्रत्येक वेळी न येता स्वामीजी तुमच्या दूरध्वनीतून व भ्रमणध्वनीतून चोवीस तास तुमच्या संपर्कात राहतील. दूरध्वनीतून स्वामींचा आशीर्वाद सदैव तुमच्या पाठीशी राहिल.."

भक्तगणांतून उत्स्फूर्त घोषणा आली..

"बाबा टेलिफोनानंद की जय.."

स्वामी अडगडानंदांचा आश्रम तिथेच आहे. तिथे तर रीघ लागतेच. पण स्वामींचा ध्वन्यानंदी अवतार 'बाबा टेलिफोनानंद' या नावाने आता जगाची नव्हे, विश्वाची काळजी वाहतो आहे.


जगभरातून लाखो भक्त आता सकाळी उठता उठता.. येता जाता कार्य करता.. स्वामीजींचे भ्रमणध्वनी दर्शन घेतात.. टेलिफोनानंद बाबांचा प्रत्यक्ष आशीर्वाद घेतात.


त्यांचे लाखो भक्त असे दूरध्वनीवरून स्वामींचे ध्वन्यावतार दर्शन घेतात नि धन्य धन्य होत म्हणतात, ' जय बाबा टेलिफोनानंद!'


डॉ. नितीन मोरे यांची ५3+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.






डॉ. नितीन मोरे
२अंकी बालनाट्य



लाडोबा
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास



डॉ नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री
नाटक



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



एका डॉक्टरची
कोविडकथा
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.






















डॉ. नितीन मोरे
Version 2.0.2.0





HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी








डॉ. नितीन मोरे
एका नाटकाची गोष्ट!


डॉ. नितीन मोरे












डॉ. नितीन मोरे





राग दरबारी

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

आधुनिक कहाण्या




डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

सांगतो ऐका

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे




सुलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!
(अर्थात कविता २ डझन)

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

## डॉ. नितीन मोरे यांचे हे त्रेपन्नावे पुस्तक.

या पुस्तकाबरोबरच डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५३पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (९), मधू

शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (८), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३६), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२२), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (६), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (९), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखानीस (६), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (३), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी

रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं “ई”यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)